# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०८/११/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०८/११/२००६ रोजी सभा सुचना क्र. २० दि. ०३/११/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ९) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १३) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १४) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती साो. :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग या सर्वांचे हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापतीसाहेब, माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की मा. महापौर मॅडम महासभामे मेरी सिग्नेचर नही है ऐसे बोलती है । जिन लोगोंकी नियुक्ती हुई है उसपे मेरा सिग्नेचर नही है । जो डयुप्लिकेट सिग्नेचर किया है उसके बारे मे प्रशासनने कुछ किया है क्या? अगर कुछ कार्यवाही की होगी तो उसके उपर खुलासा किजिये ।

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने मी आपल्याला अवगत करतो की मागील महासभेमध्ये तो विषय तहकुब होता. या ठिकाणी ते संबंधित सदस्य उपस्थित आहेत. त्यामुळे या सभागृहामध्ये तशी चर्चा होउ शकते का ? हा पहिला मुददा आहे. जर चर्चा होत असेल तर आमची चर्चा करायला तयारी आहे.

**जयंत पाटील :-**

आपण या ठिकाणी अशी चर्चा करतो की आता हया बातम्या वर्तमानपत्रामध्ये यायला लागलेल्या आहेत. महाराष्ट्र टाईम्स पेपर हा महाराष्ट्रातील छोटा पेपर नाही. जर मिरा भाईंदरमधील वर्तमानपत्रामध्ये बातमी आली असती तर आपण केअर केले नसते. परंतु, महाराष्ट्र टाईम्स हा पेपर निश्चितपणे जगभरात जातो. भारतात तर हा पेपर जातोच. अशा वर्तमानपत्रामध्ये हया बातम्या येत असतील आणि महापालिका बदनाम होत असेल तर त्यासंबंधी स्थायी समितीमध्ये चर्चा करायला कोणतीही हरकत नसावी असे मला वाटते.

**हंसुकुमार पांडे :-**

निश्चितही मिरा भाईंदर महानगरपालिका देश मे बदनाम हो रही है । इसके लिये महानगरपालिकाके आयुक्तसाहबने क्या स्टेप उठाई है?

**जयंत पाटील :-**

हा घडलेला प्रकार सगळा जो आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

ऐसे कितने प्रकरण है की जिसम महापौरने सिग्नेचर दिये है और वह प्रकरण चलते है ।

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

तर या ठिकाणी हा मुददा क्लिअर व्हायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी आम्हाला यांनी जो प्रश्न विचारला त्याबददल मुददयाचा प्रश्न येत नाही. परंतु, त्यांची आजची जी काही हकिकत आहे. म्हणजेच महासभेच्या चर्चेनंतर जो गोंधळ झालेला होता. आम्ही त्याच्यानंतर पोलिस स्टेशनला गेलेलो होतो. आम्ही मा. आयुक्तसाहेबांकडेसुध्दा गेलेलो होतो. आम्ही नगरसचिवांकडे तक्रार केलेली होती. त्यांनी एवढेच जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे की महाराष्ट्र टाईम्स या चांगल्या पेपरमध्ये म्हणजेच ज्या पेपरचे देशभर वितरण होते त्या पेपरमध्ये ही बातमी आल्यानंतर प्रशासनाची आजची हालचाल काय आहे? एवढेच निवेदन करायचे आहे. याला कोणतीही तांत्रिक बाब नाही. प्रशासन इथपर्यंत पोहोचलेले आहे एवढीच माहिती दया.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी जो मुददा उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने मी या ठिकाणी निवेदन करतो की विविध वर्तमानपत्रांमध्ये मागच्या महासभेमधील पद मंजुरीचा ठराव कायम करण्याच्या अनुषंगाने जी चर्चा घडून आली व मा. उपमहापौरांनी सहीबाबत जो मुददा उपस्थित केलेला होता त्या अनुषंगाने जी चर्चा झाली तो सदरचा विषय महासभेमध्ये तहकुब असला तरी या ठिकाणी सन्मा. सदस्यांच्या भावना विचारात घेता मी खुलासा करु इच्छितो की मा. महापौर महोदयांनी नगरसचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना त्या अनुषंगाने दोन लेखी पत्रे दिलेली आहेत. सदर पत्राची प्रत मा. आयुक्तांना दिलेली आहे. त्या अनुषंगाने मा. आयुक्त स्तरावरुन नगरसचिव यांनासुध्दा आवश्यक तो खुलासा करण्यासाठी सुचित केलेले आहे. मा. महापौर महोदयांनी नगरसचिवांना जे पत्र दिलेले आहे त्याची प्रत शासनालासुध्दा दिलेली आहे. शासनाकडूनसुध्दा या बाबीमध्ये सविस्तर वस्तुस्थिती अहवाल पाठविण्यासाठी सुचना आलेल्या आहेत. जो प्रस्ताव महासभेला पद निर्मितीसाठी महापालिकेचे वर्गीकरण होउन जो आकृतीबंध पदाचा निश्चित झालेला होता. त्या अनुषंगाने प्रशासनाने तो गोषवारा सादर केलेला होता. पद निर्मितीसाठीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणांपैकीसुध्दा सदस्य त्या सभागृहामध्ये उपस्थित होते. सदरचा प्रशासनाचा गोषवारा हा शासन आकृतीबंधानुसार निश्चित केलेल्या पदांबाबत होता. सुरुवातीला त्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला होता की ही पद निर्मिती करण्याची आवश्यकता नाही. परंतु, सभागृहामध्ये त्या अनुषंगाने शासनाचे जे धोरण आहे की या आकृतीबंधाप्रमाणे पदे मंजुर करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाने सादर करण्याचा जो उददेश होता मी त्याबाबत सभागृहाला अवगत केलेले होते. तसे ते मिनिटालासुध्दा आहे. त्या अनुषंगाने पद निर्मितीच्या ठरावावर महासभेमध्ये विचारविनिमय होउन जो ठराव पारित झाला व कालांतराने तो ठराव कायम करण्याच्या इतिवृत्तांताच्या अनुषंगाने ही चर्चा होती. आम्ही जो ठराव आकृतीबंधानुसार गोषवा-यासह सादर केलेला होता. त्याबाबत महासभेमध्ये काही आवश्यक पदांचा विचार करता उदा. पाणीपुरवठा, आरोग्य व इतर काही पदांचा त्याच्यामध्ये समावेश करुन जो ठराव अंतिम करुन नगरसचिव कार्यालयाकडून प्रशासनाला तो ठराव प्राप्त झालेला होता. मा. सुचक व मा. अनुमोदक या सर्वांच्या सहीचा तो ठराव होता. तो पद निर्मितीचा प्रस्ताव असल्यामुळे नगरसचिव कार्यालयातून तो प्राप्त झाल्यामुळे शासनाला तो ठराव सादर करण्यात आलेला आहे. शासनाकडून जो मुळ आकृतीबंधाचा विषय होता. शासनाने जी पदे मंजुर करण्याचे धोरण निश्चित केलेले होते. त्याप्रमाणे त्या अधीन काही पदांना मंजुरी दिलेली आहे. ती पदे आकृतीबंधामध्येसुध्दा आहेत. उर्वरित कोणत्याही पदांना शासनाने मंजुरी दिलेली नाही अशाप्रकारची ही वस्तुस्थिती आहे. सचिवांकडून रितसर खुलासा आल्यानंतर येत्या महासभेमध्ये त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर योग्य तो अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

सही त्यांची नाही असे सांगितलेले होते. सही आपण शासनाकडे किंवा पुण्याला सही तज्ञांकडे पाठविणार होतो किंवा पाठवतो असे आम्ही ऐकलेले होते. ती सही पाठवली की नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

आम्ही सहीच्याबाबतीत नगरसचिवांबरोबर चर्चा केली असता त्यांच्याकडे सदर ठराव सोडून तीन ठराव आहेत. सही नाही आहे असा प्रशासनाचा आक्षेपच नाही आहे. मा. महापौरांचे काही गैरसमज झालेले असतील तर ते तपासण्याबाबत त्यांच्याकडे विनंती केलेली आहे. महासभेच्या चर्चेप्रमाणे त्यांचा जो आग्रह होता. तो प्रस्ताव नगरसचिवांच्या सहीचे नमुने घेण्यासाठी मा. महापौरांकडे सादर केलेला आहे. मला असे वाटते की तुम्ही त्यांना सही मिळाली की नाही ते विचारा. जर तशी सही मिळाली तर तो प्रस्तावसुध्दा प्रशासन सही तपासण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पाठवायला तयार आहे ही या प्रकरणातील वस्तुस्थिती आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही जी वस्तुस्थिती सांगितलेली आहे. ती फिरवुन-फिरवुन सांगितलेली आहे. यांनी आकृतीबंध वगैरे सर्व आलेख सांगितलेले आहेत. परंतु, वास्तविक जी पोलिस कार्यवाही करायला पाहिजे होती. त्याबाबत प्रशासनाने काहीही केलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा.) :-**

टेम्परपरी, खोटेपणा ह्यावेळेला प्रशासनाला खात्री होईल. प्रशासन निश्चितपणे पोलिस कार्यवाही करेल.

**रतन पाटील :-**

कधी?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा.) :-**

हे खोटे आहे असे सिध्द व्हायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

असे करता येत नाही. मा. महापौरांनी मा. आयुक्त व सर्व नगरसेवकांसमोर डायसवरुन ही सही माझी नाही असे सांगितलेले होते. मग तुम्हाला आणखी काय पुरावा पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा.) :-**

मी त्या अनुषंगाने याबाबत सभागृहाला अवगत करु इच्छितो की नगरसचिवांनी जो प्रस्ताव कार्यवाहीसाठी पाठवलेला होता. त्याला त्या सहीचे नमुने मिळाले असते.

**रतन पाटील :-**

प्रशासन हयाच्यामध्ये मुक घेउन का गप्प बसलेले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा.) :-**

प्रशासन मुक घेउन गप्प बसलेले नाही.

**रतन पाटील :-**

मग तुम्ही काय कार्यवाही झाली ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा.) :-**

प्रशासकीय म्हणजे सभागृहाच्या कामकाजामध्ये एखादी शंका कुशंका निर्माण झाली तर त्याची डायरेक्ट पोलिस केस होते असे नाही. त्याबाबत शहानिशा केला जातो. त्याबाबत खात्री केली जाते. त्याच्यामध्ये प्रशासन कधीही दवडणार नाही. त्याच्यामध्ये असा खोटारडेपणा असेल तर प्रशासन फक्त पोलिस केस नाही तर कोणतीही कार्यवाही करायला तयार आहे.

**रतन पाटील:-**

याबाबत पुढिल महासभेमध्ये आक्षेप येउ नयेत मी अशा मताचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार या देशातील महापालिकेच्या कामकाजातील हा पहिला प्रकार आहे की पीठासीन अधिकारी स्वतः महापौर आहेत आणि महापौर ती सही माझी नाही असे सांगतात. आमची अशी विनंती आहे की खरोखर महापौरांची सही आहे की नाही हे समजणे आवश्यक आहे. जर ती सही मा. महापौरांनी केली नसेल तर ती सही कोणी केली? मा. महापौर स्वतः ती सही माझी नाही असे बोलतात. मग त्यांनी त्यांची सही नाही हे सिध्द करायला पाहिजे. जर ती सही मा. महापौरांची नाही तर ती सही कोणाची आहे? ते शोधायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा.) :-**

नगरसचिव, तुम्ही सहीचा अहवाल तपासणीसाठी पाठवलेला आहे त्याची सभागृहाला माहिती दयावी.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी ती सही माझी नाही असे सभागृहामध्ये सांगितले त्याबाबत शासनाला सही त्यांची आहे की नाही हे तपासण्यासाठी त्या नमुन्याबाबत पत्र लागते. मी त्याचा नमुना मा. महापौरांकडे सादर केलेला होता. परंतु, त्याच्यामध्ये सही मिळालेली नाही. मला प्रशासनाकडून दुसरे पत्र मिळालेले होते. मी त्याबाबतचा खुलासा आता त्यांना देतो.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला मा. महापौरांनी सही दिलेली नाही. परंतु, मा. महापौर डायसवरुन ही सही माझी नाही असे बोलल्या होत्या. जर तुम्हाला सही दिली नाहीतर पुढे काय करणार?

**नगरसचिव :-**

तरीसुध्दा सही तपासणे आवश्यक नाही याची.......

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर नगरपालिका १९८५ साली स्थापन झाली आणि सन २००२ मध्ये महापालिका स्थापन झालेली आहे. नगरपालिका किंवा महापालिकेमध्ये इतक्या वर्षामध्ये कधीही असा प्रकार घडलेला नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे.

**रोहिदास पाटील :-**

माझ्या माहितीनुसार कोणत्याही महानगरपालिकेमध्ये पीठासीन अधिकारी मा. महापौर आहेत. परंतु, त्यांनी कधीही असा दावा केला नसेल. मी माहिती मिळवलेली आहे. महापालिकेच्या कामकाजामध्ये ज्या स्वतः पीठासीन अधिकारी आहेत, स्वतः महापौर आहेत. त्या ती सही माझी नाही असे सांगतात. म्हणजे कधी पीठासीन अधिकारी बदलतात व ही सही या महापौरांची नाही असे सांगतात. त्या स्वतः सांगतात त्याच्यामध्ये त्याला वेगळे वेट येते.

**जयंत पाटील :-**

तुमचे या विषयावर एवढे गांभीर्य आहे. प्रशासनाकडे या विषयाचे गांभीर्य नाही. आम्ही माहिती विचारतो तेव्हा तुम्ही आम्हाला माहिती देता. तुम्ही आम्हाला कळवायला पाहिजे. तुम्ही असा-असा प्रकार घडलेला आहे, आतापर्यंत त्याबाबत ही प्रगती झालेली आहे हे स्थायी समितीला सांगायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपल्यासमोर सविस्तर अहवाल सादर केला जाईल.

**रतन पाटील :-**

प्रशासन टाळाटाळ करित आहे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

प्रशासन टाळाटाळ करत नाही. याच्यामध्ये दोन गोष्टी आहेत. या ठरावाच्या अनुषंगाने ठरावाचे सुचक, अनुमोदक व झालेला ठराव हयाला काही आक्षेप आहे का? हा मुददा सर्वात महत्वाचा आहे.

**जयंत पाटील :-**

आक्षेप आहे असे त्यांनी सांगितलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

कोणाचा आक्षेप आहे. मा. महापौरांचा आक्षेप आहे, सभागृहाचा आक्षेप आहे की कोणाचा आक्षेप आहे ते सांगा.

**जयंत पाटील :-**

सभागृहाचा आक्षेप असण्याचा प्रश्न येत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही हयाच्यामध्ये कामकाज करित असताना मी उदया माझी सही नाही किंवा माझी सही आहे असे बोललो तर त्याला प्रोसीजर आहे.

**जयंत पाटील :-**

सही नाही हे शासनाला केव्हा सांगितले?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तो मुददा तहकुब विषयामध्ये फायनल होईल. हा मुददा मा. महापौरांशी निगडीत होता आणि आहे. आमच्याकडे जी वस्तुस्थिती आहे. आम्ही त्या वस्तुस्थितीचे सर्व कथन केलेले आहे. आपण मा. महापौरांच्या पाठीमागे चर्चा करणे हे मला संयुक्तिक वाटत नाही.

**जयंत पाटील :-**

हा प्रश्न मा. महापौरांशी निगडीत नाही. हा प्रश्न संपूर्ण महापालिकेशी निगडीत आहे.

**रतन पाटील :-**

याबाबत प्रशासनाची काय जबाबदारी आहे? पेपरमध्ये बातम्या येतात. प्रशासनाची इज्जत फक्त चव्हाटयावर येते. हयाच्यामध्ये महापालिकेचे काय खोटे चाललेले आहे? हे खोटे नाही तर काय आहे? आम्ही जनतेला म्हणजेच सर्व नागरिकांना काय उत्तरे दयायची?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

या ठिकाणी अशी वस्तुस्थिती आहे की नगरसचिवांच्या अहवालाची जी माहिती मिळाली त्या अनुषंगाने सही खरी आहे की खोटी आहे त्याबाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्या ठरावावर मा. महापौरांनी अदयापपर्यंत सही केलेली नाही. पुण्याला प्रस्ताव पाठविण्याच्या सुचना होत्या. त्याच्यावर सही केली असती तर आतापर्यंत तो प्रस्ताव पाठविला असता.

**रतन पाटील :-**

मा. महापौर त्यावेळेला डायसवरुन माझी सही नाही असे बोलतात. आपण त्यांच्याकडे त्यांच्या सहीची मागणी करतो. मग हयाच्यामध्ये प्रशासनाची दुसरी अशी भुमिका आहे की आपण त्याच्यामध्ये टाळाटाळ का करतो? त्या संदर्भात मा. महापौरांकडे मुख्यालयाने विचारणा केलेली होती का? तुम्ही टाळाटाळ करता ही फार गंभीर बाब आहे. ही लहान बाब नाही. आता जी पदे मंजुर झाली. त्याचा ठराव पास झालेला नाही, इतिवृत्त पास झालेले नाही. माणसेसुध्दा कामाला आलेली आहेत. त्यांच्या नेमणुकासुध्दा झालेल्या आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही जबाबदारीने बोला. कोणती माणसे कामाला आलेली आहेत ते सांगा.

**जयंत पाटील :-**

वर्तमानपत्रामध्ये आहे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

वर्तमानपत्रामध्ये काय लिहिले जाते. हा सर्व खुलासा करणे अपेक्षित नाही. त्यामुळे सभागृहामध्ये जे बोलता त्याबाबत वस्तुस्थिती सांगा. तुम्ही वर्तमानपत्राबाबत चर्चा करित असाल तर चर्चा करु शकता. परंतु, असे विचारु नका.

**जयंत पाटील :-**

तुम्ही पेपरला खुलासा पाठवलेला आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

महासभेमध्ये हा विषय तहकुब असल्यामुळे आम्ही कोणताही खुलासा पाठवलेला नाही. हया विषयावर महासभेमध्ये अंतिम निर्णय झाल्यानंतर सदर प्रकाराचा खुलासा केला जाईल. एखादा विषय तहकुब असताना त्याच्यावर काही विवेचन करणे किंवा खुलासा करणे हे एक व्यक्ती म्हणून अपेक्षित नाही हे प्रशासनाचे मत आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण सुरुवातीला सभागृहाला हया ठरावाचे कुठलेही मत पेपरमध्ये आले म्हणून वाचले सत्य आहे. आपण याबाबत खुलासा केला का?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

दररोज पेपरमध्ये भरपूर बातम्या येतात. आपण इथे त्याचा खुलासा घेतो का?

**रतन पाटील :-**

साहेब, आपण खुलासा करायला पाहिजे. आपण खुलासा केलेला नाही. आपण आकृतीबंध आकृतीबंधानुसार फिरवत राहिलात. आपणच खुलासा करायला पाहिजे. परंतु, आपण खुलासा केलेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

काय खुलासा केलेला नाही?

**रतन पाटील :-**

आम्ही ही पदे भरलेली नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही विषयांतर करु नका असे मी तुम्हाला स्पष्ट सांगतो. काय खुलासा केलेला नाही ते सांगा.

**रतन पाटील :-**

तुम्ही काय खुलासा केला तो सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

काय खुलासा केलेला नाही?

**रतन पाटील :-**

तुम्ही ही पदे भरलेली नाहीत याचा खुलासा केला का?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

प्रश्नच नाही. तुम्हाला माहिती नसेल तर माहिती घेउन बोला.

**रतन पाटील :-**

जर आम्हाला माहिती नसेल तर तुम्ही आम्हाला माहिती सांगायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही पेपर वाचून माहिती विचारु नका.

**रतन पाटील :-**

आम्ही पेपर वाचून माहिती विचारलेली आहे. तुम्ही आम्हाला माहिती सांगायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्या ठरावाच्या अधीन कुठलेही पद भरलेले नाही असे मी सभागृहाला आश्वासन देतो.

**रतन पाटील :-**

हे आश्वासन आधी सांगितले असते तर दोन मिनिटांमध्ये प्रश्न सुटला असता. आम्ही या विषयावर बोललोच नसतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की आता सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी सांगितले की पदे भरलेली नाहीत. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे मा. आयुक्तांच्या सहीने मंत्रालयात पद मंजुरीचा ठराव पाठवलेला आहे. तो योग्य आहे का?

**रतन पाटील :-**

त्या दिवशी मा. आयुक्तसाहेब बोलले होते.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्तांनी सांगितलेले होते.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

ती बाब मान्य केलेली आहे. मी तुम्हाला तेच सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

आता तुम्ही पाठवलेला नाही. मा. महापौर स्वतः ती सही माझी नाही असे सांगतात असे असतानासुध्दा आपण तो ठराव प्रधानसचिवांकडे मंजुरीसाठी पाठवलेला आहे. हे योग्य आहे का? मा. महापौर ज्यावेळेला सही माझी नाही असे बोलतात तर तुम्ही त्या सहीबाबत काय केले?

**रतन पाटील :-**

तुम्ही याबाबत काय केले? मी हा प्रश्न प्रशासनाला विचारतो.

**शशिकांत भोईर :-**

पेपरमध्ये बातमी आल्यानंतर चर्चेमध्ये ती बातमी जाते. सहजासहजी जात नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही मुळात एक गोष्ट सांगू इच्छितो की प्रोसीडिंगला मंजुरी मिळण्यापूर्वी तुम्ही कसे पाठवले? आपण असे पाठवू शकतो का? त्याचा काय नियम आहे? तुम्ही मला फक्त नियम सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपले दोन प्रकारचे कामकाज असते. महासभेने एखादा ठराव मंजुर केल्यानंतर किंवा एखादया विशेष समितीने एखादा ठराव मंजुर केल्यानंतर त्याची अंमलबजावणी मा. आयुक्त महोदयांकडून केली जाते. मा. आयुक्त महोदयांकडून ने त्या ठरावाच्या अनुषंगाने खात्री पटली तर तो ठराव प्रशासनाच्या अनुरोधाने असेल व त्यांचे अंमलबजावणी करण्यासाठी मत झाले असेल तर आयुक्त महोदयांकडून त्याची अंमलबजावणी करु शकतात. ते करित असताना सभेचे इतिवृत्त कायम करुन अंमलबजावणी करणे किंवा महासभेने किंवा विशेष समितीने इतिवृत्तांताची वाट न बघता अंमलबजावणी करणे असे संकेत आहेत. परंतु, आपल्या महापालिकेच्या कामकाजामध्ये तसे कधीही बघितलेले नाही किंवा त्या ठरावावर इतिवृत्तांताची वाट न बघता अंमलबजावणी करावी असे लिहिले जाते. आपल्याकडे ही पध्दत कार्यान्वित करावी लागेल. आपण त्या एका ठरावावर चर्चा करता. आपण इतर दैनंदिन ठराव त्याच पध्दतीने अंमलबजावणी केलेली आहे की त्याच्यावर इतिवृत्तांताची वाट न बघता अंमलबजावणी केलेली आहे. हयाच्यामध्ये प्रशासन गांर्भीयाने बघत आहे.

**जयंत पाटील :-**

एरवी सहीचा प्रॉब्लेम झाला नसता तर हा प्रश्न उदभवला नसता.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

पद मंजुर झाल्यानंतर सहीचा प्रॉब्लेम आला का? शासनाला प्रशासनाकडून बेकायदेशीर ठराव रिकमेन्ड केला तर येणा-या महासभेमध्ये मी प्रश्न विचारु शकतो. मा. महापौरांनी प्रशासनाला तात्काळ निदर्शनास का आणले नाही? मी त्या महासभेमध्ये उपस्थित नव्हतो. परंतु, आपली सविस्तर चर्चा तहकुब बैठकीमध्ये होईल. हयाच्यामध्ये कुठलेही खोटे नाही. खोटे असेल तर महासभेमध्ये सिध्द होउ दया. आपण त्यानुसार कार्यवाही करुया.

**जयंत पाटील :-**

तुम्ही खोटे नाही बोलता. परंतु, तुम्ही प्रोसीडिंगला मंजुरी मिळण्यापूर्वी शासनाकडून मंजुरी घेउ शकत नाही. आम्हाला याबाबत माहिती दया.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपल्याकडे तसा प्रकार नाही.

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांत कायम झाल्यानंतर कार्यवाही करता येते. दुसरी गोष्ट म्हणजे इतिवृत्तांताचा जो ठराव आहे. तो सभागृहामध्ये वाचुन कायम केल्यानंतर कार्यवाही करता येते.

**जयंत पाटील :-**

मग तुम्ही आता का फेटाळला? तुम्ही हे त्या महासभेमध्ये घ्या असे सांगितले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सदरचा विषय महासभेमध्ये तहकुब असल्यामुळे त्याची अंमलबजावणी केलेली नाही. शासनाकडून ती पदे मंजुर आहेत. महासभेत हा विषय तहकुब असताना त्याची अंमलबजावणी कशी केली जाईल? तो विषय तहकुब नसेल तर त्याची रितसर अंमलबजावणी झाली असती.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, या ठिकाणी एक विषय महत्वाचा आहे की पद मंजुर करायची आहेत. तर आपल्याला किती पदे भरायची आहेत? हयाच्यामध्ये एवढे काय महत्वाचे आहे. त्याच्यामध्ये काय कारण आहे ते मला माहिती नाही. परंतु, त्यांना त्याची खूप आवड आहे. त्यामुळे त्यांनी तो विषय घाईघाईने शासनाकडे पाठवून मंजुर करुन घेतलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही प्रशासनाचे कौतुक करायला पाहिजे. कारण त्याच्यामध्ये प्रशासनाचा काहीही इन्टरेस्ट नाही. एखादी बाजू आली म्हणजे काहीतरी आक्षेप करायचा याला प्रशासन मान्यता देत नाही. हयाच्यामध्ये काय इन्टरेस्ट आहे. आपण त्याचा खुलासा करावा. तुम्ही ज्येष्ठ सदस्य आहात. तुम्ही काय इन्टरेस्ट आहे त्याच्यात असे बोलणे योग्य नाही.

**जयंत पाटील :-**

काय इन्टरेस्ट आहे ते तुम्हीच शोधा. तुम्ही त्याबाबत अभ्यास करायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

एखाद्या बाबीविषयी बोलताना आपण सिध्द करुन बोलायला पाहिजे. मला हे मान्य नाही. आपण जे बोलाल ते आम्हाला मान्य नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला मान्य असेल किंवा नसेल परंतु, मी चुकीचे बोललो नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

आता हे ज्येष्ठ सदस्य काहीतरी बोलतील ते आम्ही मान्य करायचे का? इन्टरेस्ट आहे म्हणजे काय? प्रशासनाचा इन्टरेस्ट महापालिकेसाठी आहे. त्या ठिकाणी प्रशासनाचा काही वेगळा इन्टरेस्ट असेल तर तुम्ही सिध्द करावे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकरसाहेब, तुम्ही रागावू नका.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

एखादी बाब ऑफिशियल असेल तर चर्चा करावी. जर ती बाब अनऑफिशियल असेल तर चर्चा करु नये.

**रोहिदास पाटील :-**

हे विचारतात त्याच्यामध्ये चुक नाही. तुम्ही उत्तर देता त्याच्यामध्ये चुक नाही. परंतु, तुम्हाला मुळात रागवण्याचे काहीही कारण नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

एवढी गंभीर बाब असल्यावर कोण रागवत नाही ते सांगा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही संगणकावर नोंद करता का? आम्हाला इकडची आकडेवारी माहिती आहे. सर्व काही माहिती आहे. काहीही लपून राहिलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

काहीही लपून राहत नाही. कारण हे लोक प्रशासन आहे. लोक प्रशासनामध्ये सर्व काही ओपन रहावे हे अपेक्षित आहे. त्याच्यामुळे लपून राहण्याचा प्रश्न येत नाही.

**जयंत पाटील :-**

तुमचा कारभार ट्रान्सफरन्ट चाललेला आहे हे मला माहिती आहे. मा. सभापती महोदय, मी एवढेच सांगतो की ती लोक पदे मंजुर करतात. परंतु, अजुनपर्यंत रिटायर झालेल्या माणसाला पेन्शन मिळालेली नाही. एक वर्ष होउन गेलेले आहे. परंतु, काहीही चेन्ज करत नाही. या विषयाला धरून बोलतो. तुम्ही काहीही चेन्ज करित नाही. हया लोकांना पेन्शन दिली नाही तर ती लोक मरतील. मी त्या विषयाला धरुन बोलत आहे. हे ५३८ कर्मचारी रिटायर झालेले आहेत. त्यांना दहा वर्षे होउनसुध्दा तुम्ही त्यांना परमनन्ट करु शकत नाही. आता मी हा विषय ट्रान्सफर करतो असे तुम्ही म्हणणार.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्हाला ५३८ सफाई कामगारांचा विषय माहिती आहे.

**जयंत पाटील :-**

तो विषय सगळयांना माहिती आहे. त्याबाबत एक बाई कोर्टात गेलेली होती.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी याबाबत सभागृहाला माहिती देउ इच्छितो की आपल्याकडे ५३८ कर्मचा-यांमध्ये अस्थायी कर्मचारी कार्यरत होते. ते आपल्याकडे खूप दिवसांपासून कार्यरत होते. शासनाने त्यावेळेला असा धोरणात्मक निर्णय घेतला की त्या कर्मचा-यांना फिक्स तारखेपर्यंत कायम करण्यात यावे. त्या पध्दतीने आपल्या महापालिकेतसुध्दा त्या ठिकाणी खूप चांगल्या पध्दतीने पाठपुरावा झालेला आहे. सर्व सदस्यांची त्याला मदत होती. शासनाने आपले ५३८ कर्मचारी कायम केले. ते कर्मचारी कायम करताना हे सरसकट धोरण राबविण्यासाठी इतर महापालिका, नगरपालिकेला शासनाने लागू केल्याप्रमाणे आपल्या महापालिकेचे कर्मचारी कायम करताना ती अट टाकावी लागली तर ही पदे ज्या तारखेपर्यंत कार्यान्वित राहतील तोपर्यंत त्यांना सामावून घेण्याचा निर्णय झालेला आहे. तरी पदांना जे पेन्शन आणि इतर उपलब्धी दिल्या जातात. त्या हयांना दिल्या गेलेल्या नाहीत. ते आपल्या महापालिकेला दिलेले नाही असे नसुन महाराष्ट्रात या दरम्यानच्या काळात किंवा हया टाईपची जी पदे आहेत. या पध्दतीची पदे आहेत. जी अस्थायी पदे सामावून घेण्याचा निर्णय झालेला नाही. म्हणजे निवृत्तीनंतरच्या सुविधा दिलेल्या नाहीत. त्या अनुषंगाने महासभेला झालेले निवेदन, स्थायी समितीमध्ये झालेले निवेदन विचारात घेता आपण त्याबददलच्या त्या कर्मचा-यांना बेनिफिट किंवा फॅसिलिटी मिळावी म्हणून शासनाकडे ती अट शिथिल करण्यासाठी अनुकंपाच्या धर्तीवर किंवा लाड समितीच्या धर्तीवर त्यांच्या पाल्यांना नोकरी मिळावी, त्यांना पेन्शन लागू व्हावी ही बाब लागू करण्याचा प्रस्ताव आपण

शासनाकडे सादर केलेला आहे. तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. अजुनपर्यंत त्याच्यावर कोणताही निर्णय झालेला नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला शासनाच्या विरोधात कोर्ट डिसीजन देते. श्रीम. रत्नप्रभा मोघेचे काय झाले? शासनाच्या निर्णयाच्या विरोधात कोर्टाने निकाल दिलेला आहे. तुम्ही तो निकष ५३८ कर्मचा-यांना का लावत नाही? तुम्हाला त्याचा अधिकार आहे. जर तुम्ही तो निकष पकडला तर ५३८ कर्मचा-यांना तो निकष लागू होउ शकतो.

**रोहिदास पाटील :-**

आमचा असा आग्रह आहे की तुम्ही त्या निवाडयाचा आधार घेउन या लोकांना न्याय दयावा.

**जयंत पाटील :-**

आता ते कर्मचारी म्हातारे व्हायला आलेले आहेत. त्यांची १०-१५ वर्षाची सेवा अशीच फुकट जाणार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण त्याबाबत शासनाकडे मागणी केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला त्याची काहीही आवश्यकता नाही. मी तुम्हाला तो सगळा निकाल सांगतो. आता हे जे कर्मचारी सन २००५ मध्ये रिटायर झाले. त्यांना अजूनपर्यंत पेन्शन मिळत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांच्या आदेशामध्ये ती सवलत नाही अशी मी तुम्हाला माहिती दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

कुठे माहिती दिलेली आहे?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही ५३८ कर्मचा-यांबाबत माहिती दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

ते ५३८ सफाई कामगार नाहीत. ते रिटायर व्हायला आलेले वेगळे कर्मचारी आहेत. २००५ ला ते रिटायर झाले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

रेग्युलर आणि स्थायी कर्मचारी म्हणून जे काम करित होते. ते कर्मचारी रिटायर झालेले आहेत आणि त्यांना सवलत मिळत नाही असे यांचे म्हणणे आहे.

**रतन पाटील :-**

त्याच्यामध्ये ५३८ कर्मचारीसुध्दा रिटायर होणार आहेत.

**जयंत पाटील :-**

मी या ठिकाणी आदेश वाचतो. तुम्हाला या आदेशाद्वारे सेवा निवृत्तीबाबत कळविण्यात येते की दि. ३०/१/१९८४ पासून मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मी सफाई कामगार या पदावर काम करित असून जन्म तारखेपासून दि. २८/२/२००५ रोजी ६० वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजे सन २००५ मध्ये रिटायर झालेले आहेत. अजुनपर्यंत या पाच लोकांना पेन्शन मिळत नाही. म्हणजे आपण त्यांना लाकडे आणायला पैसे देणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

चांगल्या गोष्टीला कोणीही सपोर्ट करतो.

**रतन पाटील :-**

साहेब, ही आपली एकमेव महापालिका आहे. प्रशासनाला जोडीला घेउन लोकप्रतिनिधी सपोर्ट करित आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सो.) :-**

मग तुम्ही त्या मुददयावर चर्चा करा.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकरसाहेब, तुम्ही शांतपणे ऐका. तुम्ही तुमच्याबददल गैरसमज करुन घेउ नका. मी मा. सभापतींना विनंती केलेली होती की दोन कर्मचा-यांचा विषय चर्चेला घ्या. तुम्ही त्यावेळेला सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण हे प्रकरण निकालात काढू असे उत्तर दिलेले होते. आपल्या चर्चेला कोणाचे काहीही कारण असू शकत नाही. तुम्ही हे प्रकरण निकालात कसे काढले? श्री. देवीदास पाटील आणि श्री. संतोष पाटील ही दोन मुले १४ वर्षे नोकरी करित आहेत. तुम्ही त्यांना दि. २०/१०/२००६ पासून शिपाई या पदावर कायमस्वरुपी तदर्थ नेमणुक देण्यात येत आहे असे पत्र दिलेले होते. मग हे १४ वर्षे काय झाले? आम्ही अशी मागणी केलेली होती की ती लोक १४ वर्षे नोकरी करतात. कोर्टाच्या आदेशानुसार तुम्ही.....

**जयंत पाटील :-**

आम्ही श्री. खतगांवकरसाहेबांना वैयक्तिकपणे बोलत नाही. आम्हाला ज्या पदाची माहिती मिळालेली आहे. आम्ही त्या पदांबाबत बोलतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही त्यांना त्रास द्या आणि आम्हीसुध्दा चालवू हेसुध्दा सांगून ठेवतो. तुम्ही जे काही कराल ते नियमानुसार करा असा आम्ही आग्रह धरतो.

**फॅरो ग्रिटा :-**

तुम्ही सभापतींना असे कसे बोलता?

**रोहिदास पाटील :-**

ते ओरडणारे सदस्य आहेत. आम्ही ओरडणारे सदस्य नाही. साहेब, आपण आदेश दिलेला आहे. तुम्ही तो लक्षात घ्या. आपण त्या माणसांना आदेश दिला की दि. २०/१०/२००६ पासून शिपाई या पदावर कायमस्वरुपी तदर्थ नेमणुक देण्यात येत आहे. त्यांनी १४ वर्षे नोकरी केली. आपण त्यांना कोर्टाच्या आदेशाप्रमाणे पगार देत आहोत. साधारणपणे असे अपेक्षित असते की सदर कर्मचारी आस्थापनेवर काम करित असताना तो कायम कधी होतो? ह्याचे तुमच्याकडे उत्तर आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही बोला.

**रोहिदास पाटील :-**

आज त्या कर्मचा-यांनी १४ वर्षे काम केल्यानंतर आपण हा आदेश देण्यामध्ये त्याच्यात काय नाविन्य आहे ते सांगा. आमची अशी मागणी होती की त्यांचा इतक्या वर्षाच्या कार्यकालाप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी, पदोन्नती मिळावी असे आमचे पत्र होते. त्यानुसार तुम्ही त्याच्यामध्ये नेमणुक केली असेल तर तुम्ही काय करणार? त्या ठिकाणी कोणी कर्मचारी असता तर त्याचे काय झाले असते? तुम्ही या ठिकाणी फक्त दोन मुलांची नांवे घेउ नका.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

संबंधित कर्मचारी आमच्याकडे गेल्या दहा वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये काम करित होते. श्री. संतोष पाटील आणि श्री. देवीदास पाटील अशी त्यांची नांवे आहेत. आपल्याकडे हे दोन कर्मचारी अस्थायी स्वरुपात होते. सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना आणि त्यांचे अर्ज विचारात घेता मागील निवड समितीमध्ये रिक्त पदांवर आम्ही त्यांना कायम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपल्या मागणीप्रमाणे त्यांच्या नियुक्ती तारखेपासून कायम करण्याचे अधिकार निवड समितीला नाहीत. त्यांचे अर्ज आम्ही येणाऱ्या स्थायी समितीसमोर सादर करणार आहोत. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर त्यांना बॅक इफेक्ट देता येतो. मी मा. सभापती महोदयांना ही बाब निदर्शनास आणलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही विनंती करतो की तो विषय माझ्याशी, सन्मा. सदस्य जयंत पाटील, सन्मा. सदस्य रतन पाटील यांच्याशी संबंधित आहे असा अर्थ न घेता असा कोणताही कर्मचारी की ज्याच्यावर अनेक वर्षे नोकरी करुन त्याला वेतनश्रेणी, पदोन्नती मिळत नसेल तर तुम्ही तो ठराव आणा. ही यादी देताना १०-१२ जेवढे कर्मचारी असतील त्यांचा ठराव आणा.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

या ठिकाणी दोनच कर्मचारी आहेत. आपण ते मान्य केलेले आहे.

**मा. सभापती साो. :-**

कोणावरही अन्याय होता कामा नये.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांना आश्वासित करु इच्छितो की कोणतेही कामकाज अवैध केले जाणार नाही. परंतु, ज्या ठिकाणी सत्य असेल आपण त्या ठिकाणी सपोर्ट करावा. कोणी नाही बोलणार नाही. सर्वजण चर्चा करायला लागले तर कठिण होईल.

**जयंत पाटील :-**

आम्ही मा. सभापती महोदयांबरोबर आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

ज्या ठिकाणी निर्णायक भुमिका घ्यावी लागते. त्या ठिकाणी सर्वांनी खंबीरपणे ती भुमिका मांडली पाहिजे. कोणीही विषयांतर करु शकतो. परंतु, त्याचे सत्य काढता यायला पाहिजे ही माझी विनंती आहे.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही त्याच्यामध्ये ५३८ कामगारांचा विषय घ्यायला सांगितलेले होते.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकरसाहेबांच्या पाठीमागे किती पडायचे?

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

माझ्या पाठीमागे नाही. जी वस्तुस्थिती आहे. ती मी सांगितलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही शंका ठेउच नका. आपण एकदम पारदर्शक काम करुया.

**गीता जैन :-**

साहेब, मी पुन्हा सिग्नेचरचा मुददा काढते. आप बोल रहे है की वह साईन का नमुना नही इसलिये हम नही भेज सके । मगर इन्होने इतने सारे ठरावमे उन्होने साईन की है और वह ठराव पास हो गये है । वह भी साईन के नमुने है । हम लोग वह नमुना नही ले सकते क्या?

**नगरसचिव :-**

उसमे जो हस्ताक्षर चेक करने के दो तरिके है । हमारे पास एक नमुना है और दुसरा मिलता तो दोनो साथमे जाते। उसके वजहसे ऐसे हो रहा है । फॉर्मेट के लिये उसका फॉर्मेट चेन्ज हो गया है ।

**गीता जैन :-**

वह कम्प्लसरी है।

**नगरसचिव :-**

त्यांना फॉर्मेट तसा लागतो.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) सा<sup></sup>ो.) :-**

माझी या ठिकाणी अशी विनंती आहे की आपण हया विषयावर महासभेमध्ये चर्चा करुया.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला स्पेसिफिक परसनने उत्तर पाहिजे असे काहीही नाही. तुम्ही आम्हाला ॲथोन्टिक पध्दतीने उत्तर दया. विषय संपला.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी या ठिकाणी सहा कर्मचा-यांचा पेन्शनचा मुददा उपस्थित केलेला आहे. मी याबाबत माहिती देउ इच्छितो की संबंधित कर्मचारी हा ग्रामपंचायत काळापासून आपल्याकडे कार्यरत होता. तो कर्मचारी त्यावेळेला अर्हताप्राप्त वयापेक्षा जास्त वयाने कार्यरत होता. त्याला पेन्शन देता आलेली नाही आणि त्याचे वय माफीचे प्रकरण वयक्षेपण करण्यासाठी शासनाकडे पाठवलेले आहे. आम्ही त्याचा पाठपुरावा करित आहोत. आम्ही माहिती घेतलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही मागच्या वेळेला सर्व सन्मा. सदस्यांनी संगणकचालकाबाबत मागणी केलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

आपण त्यावेळेला १६ संगणकचालक घेण्याचे ठरवलेले होते. परंतु, तुम्ही ऑर्डर दिलेली नाही.

**शशिकांत भोईर:-**

तुम्ही ऑर्डर दिलेली नाही.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२८ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मी या ठिकाणी निदर्शनास आणून देउ इच्छितो की आपल्याकडे डासांचे, मच्छरचे प्रमाण जास्त वाढलेले आहे. त्याच्यामुळे आजार वाढलेले आहेत. आता आपल्याकडे डॉक्टरसाहेब आलेले आहेत. गेल्या मिटींगला विषय काढलेला होता. परंतु, त्यांना त्यांचा चार्ज दिलेला नाही. त्यांना त्यांचा पदभार दिलेला आहे की नाही. कारण आपण जर त्यांना केबीन देउन त्यांचा पगार दिला असेल तर तत्पूर्वी आपली कामे होत नाहीत. आपण त्यांचे विचार. त्यांचे या मिरा भाईंदरमध्ये सक्रिय करुन त्यांचे ज्ञान मिरा भाईंदरसाठी काही कामाला येईल, कुठेतरी नियंत्रण होईल अशा पध्दतीने रोगांवर नियंत्रण होण्यासाठी त्यांना प्रशासनाने पदभार दिला की नाही याबाबत प्रशासनाने खुलासा केला तर बरे होईल.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

आरोग्य विभागाचे संपूर्ण कामकाज वैदयकिय अधिकारी श्री. राठोड यांना देण्याचे ठरवलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

संपूर्ण आरोग्य विभागाचे अधिकार त्यांना दिलेले आहेत. आता काही आजार झाले तर आपल्याला त्यांना वेठिस धरावे लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

आरोग्य विभागाचे सर्व कामकाज स्वतंत्रपणे मा. आयुक्तांच्या नियंत्रणाखली श्री. राठोड यांच्याकडे दिलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे कुठल्याही रोगाची लागण झाली तर आपण त्यांना दोषी ठरवावे लागेल. आपण त्यांना तुमचे नियंत्रण नाही असे सांगावे लागेल.

**जयंत पाटील :-**

डॉ. पडवळसाहेबांचे काय झाले? ते तात्पुरते आहेत ना.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

होय.

**शशिकांत भोईर :-**

मी मागच्या मिटींगला अतिक्रमणचा विषय काढलेला होता. ते अधिकारी येणार होते. ते आले का?

**जयंत पाटील :-**

डॉक्टरसाहेब, तुम्हाला अधिकार मिळाले का?

**मा. सभापती सो. :-**

तुम्हाला ऑर्डर दिली का?

**डॉ. राठोड :-**

होय.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याकडून मिरा भाईंदरमध्ये चांगले कार्य व्हावे अशी मी तुम्हाला सदिच्छा व्यक्त करतो. कारण जोपर्यंत तुम्हाला कार्यभार मिळालेला नव्हता. तोपर्यंत आम्हाला मिरा भाईंदरचे काय होईल? अशी खंत होती. कारण लोक आजाराने ग्रासलेले आहेत. डासांचे प्रमाण वाढलेले आहे. तुम्ही त्याच्यावर नियंत्रण ठेवा. धुर फवारणी करायची असेल तर ती झाली पाहिजे. त्याचा निर्णय स्थायी समितीमध्ये लवकरात लवकर येउन आम्ही आमच्या सभापतींचे अभिनंदन करणार आहोत. आपल्याकडून तशी चांगली कामे असतील तर ती करुन घ्यावी. ज्ञानाने तुमच्या कार्यकौशल्याने तुम्ही तुमचे काम दाखवावे ही सदिच्छा आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आमच्या तब्येतीची काळजी घ्या. कारण हया शहरामध्ये ८४ नगरसेवकांना आम्ही सुरक्षित आहोत की नाही अशी काळजी वाटते.

**डॉ. राठोड :-**

आता ऑर्डरवर सही झालेली आहे. मा. सभापतींच्या परवानगीने मी सभागृहाला धन्यवाद देतो. माझ्याकडून निश्चितच चांगली कामे होतील. कारण माझा अनुभव चांगला आहे. मी जवळजवळ आठ वर्षापासून डिस्ट्रिकेट ऑफिसर म्हणून काम करित होतो. मी आतासुध्दा वर्ध्याला डिस्ट्रिकेट ऑफिसर होतो. मी त्याच्यामध्ये संपूर्ण जिल्हयाचे काम सांभाळलेले आहे. माझ्याकडे जवळपास २००० कर्मचारी आहेत. त्यामानाने इथे कमी कर्मचारी आहेत. मी आपल्या सुचनांचे फार चांगल्या पध्दतीने पालन करण्याची दखल घेण्याचा प्रयत्न करेन. मी एक-दोन दिवसांत सॅनिटेशन आणि हेल्थवाल्यांची मिटींग लावणार आहे. मला पुन्हा अशी विनंती करावीशी वाटते की आपला १२ तारखेला पल्स पोलिओचा कार्यक्रम आहे. मी त्याच्यामध्ये आपल्या सर्व मेडिकल ऑफिसर्सना भेटायला सांगितलेले आहे. आपण भागीदार म्हणून आपल्या हाताने एखादया ठिकाणी पल्स पोलिओचे उदघाटन झाले पाहिजे. मी याबाबत सर्व वैदयकिय अधिका-यांना सांगितलेले आहे की आपल्या सर्व नगरसेवकांना स्वतः भेटा आणि त्यांना विनंती करा की आपल्याकडे जिथे पल्स पोलिओचा बुथ आहे. त्या ठिकाणी एखादया सदस्यांनी पल्स पोलिओचे उदघाटन करावे. त्या दिवशी शिक्षण अधिका-यांची मिटींग घेतलेली होती. त्याच्यामध्ये सर्व शाळांच्या प्रभात फे-या वगैरे करायला सांगितलेले आहे. आपला पल्स पोलिओचा कार्यक्रम १२ तारखेला आहे. मला याबाबत सगळयांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**रतन पाटील :-**

तुम्हाला पल्स पोलिओबाबत कळकळ आहे. ते तुम्ही पाठवलेल्या तुमच्या पत्रावरुन दिसुन येते. तुम्ही पत्र पाठवलेले आहे. तुम्हाला मिरा भाईंदर महानगरपालिकेचे लेटर पॅड मिळाले नाही का? तुम्ही चांगली कामे केलेली आहेत. तुम्ही एका कागदावर सगळे व्यवस्थित सर्व नगरसेवकांना पत्र दिलेले आहे हे योग्य नाही.

**डॉ. राठोड :-**

आमच्याकडे क्लार्क नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याकडे रु. १५० कोटीचे बजेट आहे. तुम्ही हया बजेटमध्ये सर्व काही बघा. आमच्याकडे काही लेटर कॉम्प्युटरवर टाईप केलेली येतात. कुठलेही लेटर कोणत्याही वैदयकिय अधिका-यांना दिले असेल तर ते स्वतःच्या सहीने व हाताने लिहून दिलेले आहे. ही आपल्या मिरा भाईंदरची चांगली प्रगती आहे.

**जयंत पाटील :-**

डॉक्टरांचे अक्षर चांगले आहे. सर्व डॉक्टरांचे अक्षर चांगले नसते.

**डॉ. राठोड :-**

आम्ही लसीकरणसाठी नर्ससोबत पाहणी केलेली आहे. काही ठिकाणी मुस्लिम वस्ती जास्त होती. ती लोक बोलले की लसीकरण व्यवस्थित होत नाही. मग मी त्या ठिकाणी आमच्या एका सफाई कामगाराला घेतले. त्याला म्हटले की तू तुझ्या भाषेमध्ये या लोकांना चांगल्या प्रकारे समजावून सांग की, एकही मुलगा लसीकरण बिना नही रहना चाहिए।

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही याबाबत नक्की दखल घ्यायला पाहिजे.

**डॉ. राठोड :-**

मी ह्यांनासुद्धा आपण रॅली काढूया असे बोललो होतो. जेणेकरुन जास्तीत जास्त लोक येतील.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपायुक्तसाहेब, तुम्ही ह्यांना डिक्शनरी किंवा क्लार्क वगैरे द्या. माझासुद्धा अनधिकृत बांधकाम नियोजन विभागाचा विषय होता. त्याच्याशी संबंधीत अधिकारी येणार होते. कोणते अधिकारी येणार होते? ते मला माहित नाही. आता ए. टी. पी.चे श्री. चव्हाणसाहेब आहेत. ते त्यावेळेलासुद्धा उपस्थित होते. आणखी कोणते अधिकारी येणार होते. माझी चर्चा शेल्टर हॉटेलबाबत होती. कोणते अधिकारी येणार होते? डॉक्टर आता आले की नाहीत ते सांगा माझी इतिवृत्तांतामध्ये अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाबाबत चर्चा होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही कोणत्या अनधिकृत बांधकामाबाबत बोलता?

**शशिकांत भोईर :-**

बरीच अनधिकृत बांधकामे आहेत. आपण सेन्टर हॉटेल तोडले. त्याच्यासाठी जो खर्च केलेला होता. तिथे पुन्हा बांधकाम सुरू झालेली आहेत. मग आपण मंजुरी कशी दिली? प्रशासनामधील कोण निवेदन करणार आहे ते सांगा. आपला नाहक खर्च झालेला होता. आपण त्याच्यावर खर्च वसुल केला की नाही ते सांगा याबाबत सर्व निवेदन व्हावे. कोणते अधिकारी येणार होते. आंम्हाला तेसुद्धा दाखवावे. त्यावेळेला श्री. चव्हाणसाहेब उपस्थित होते.

**मा. सभापती सो :-**

आपण एक बैठक घेउुन या विषयावर चर्चा करुया. मी त्यावेळेला जो काही डिसीजन घ्यायचा असेल तो सांगेन.

**तुळशीदास म्हात्रे :-**

एखादी इमारत तोडल्यानंतर ती इमारत पुन्हा कशी होते. अधिकारी स्टे आला असे बोलतात. परंतु, स्टे आला म्हणजे जसे आहे तशी रहायला पाहिजे. मग ती बिल्डींग पुन्हा कशी होते? हे अधिकारी नेहमी स्टे येतो असे सांगतात. परंतु, नेहमी - नेहमी स्टे कसा येतो? तुम्ही एकदा बांधकाम तोडले तर पुन्हा सुरू करता. मग काय फायदा आहे? काशिमिराचे हॉटेल तोडले आणि त्याचे बांधकाम आता पुन्हा सुरु झालेले आहे. ही बांधकामे पुन्हा होतात. त्याचा काय अर्थ आहे? तुम्ही स्टे आलेला आहे असे बोलले म्हणून मी बोलतो.

**रोहिदास पाटील :-**

आप नही बोल रहे है। इसलिए मैं बोलता हूँ की शांती नगर सेक्टर क्र. ४ मध्ये जे एक शितलादेवीचे मंदिर आहे. आपला त्याच्यावर अतिक्रमण विभाग एक धार्मिक भावना दुखावतील वगैरेचा काहीही विचार करित नाही. गेले आणि तिथे बांधकाम तोडले. आपली तिथे एक शेड आहे. ते अनधिकृत आहे. त्याबाबत अनेक नागरिकांच्या लेखी तक्रारी आहेत. माझ्याकडे त्याच्या तारखा आहेत. ते का तोडले जात नाही. याबाबत श्री. तायशेटे बोलले की मा आयुक्तांबरोबर बोलतो आणि आयुक्तांची ऑर्डर घेतो आणि सदर बांधकाम तोडतो. आज चौथा दिवस आहे आपण परवाच्या दिवशी भेटलो होतो.

**एस. ए. खान :-**

जबरदस्ती का विवाद क्यो वह जो शेड है। वह बारा साल पुरानी शेड है। अभी हम लोगोने जो गार्डनका रिझर्व्हेशन किया है। उसके कोपरेमे ओरिजनल गार्डन है, मैदान है। उसके कोपरे के अंदर मुर्ती रखके यह विवाद क्यों पैदा करने का। यह इन लोगोंका कर्तव्य नही है।

**रोहिदास पाटील :-**

हे आजचे नाही.

**एस. ए. खान :-**

वह पंधरा दिन पहलेका मंदिर है।

**रोहिदास पाटील :-**

आपने मंदिर तोडनेका बोला था।

**एस. ए. खान :-**

मंदिर तोडने का सवाल नही पैदा होता है। यह मंदिर १५ दिन पुराना है।

**रोहिदास पाटील :-**

आप वहाँकी नगरसेवक है। आपने वह मंदी आठ दिन पहले किया है ऐसे सही बोला होगा की यह मंदिर आठ दिन पहले किया और मंदिर बनाया है तो अलग बात है। मेरे पास जानकारी है। वह शितला देवीका मंदिर पुराना है।

**एस. ए. खान :-**

आपको गलत जानकारी दी है।

**रोहिदास पाटील :-**

उसके बारे मे अधिकारी इनक्वायरी करेंगे।

**एस. ए. खान :-**

अधिकारी भी इनक्वायरी करेंगे।

**रोहिदास पाटील :-**

मेरे जानकारी का मतलब पुराना है। नया नही है। चार दिनका नही है, पंधरा दिनका नही है और महिने का भी नही है। जुना है।

**हंसुकूमार पांडे :-**

अभी का है।

**रोहिदास पाटील :-**

आपकी ऐसी तक्रार उचित नही है। हम लोग कभी भी ऐसे नही करते है। आप सन्मानित नगरसेवक है। आपके प्रभागमें ऐसे होगा तो कैसे चलेगा। जर अधिकारी जात असतील तर त्याबाबत मा. आयुक्तांची परवानगी घेतलेली होत का? मग मंदिरे तोडताना परवानगी घ्यायला पाहिजे होती का?

**एस. ए. खान :-**

ते मंदिरे तोडलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मंदिराबाबत कोणाचे काय मत आहे ते सांगा. मंदिराचा भाग तोडतेवेळी त्या वातावरणाचा सखोल अंदाज घेउन मंदिर तोडायचे, प्रशासनाची एक नैतिक जबाबदारी असते.

**एस. ए. खान :-**

आम्ही तिकडचे जे काही असेल ते बघू.

**रोहिदास पाटील :-**

मग आम्ही काय करणार?

**एस. ए. खान :-**

तुम्हाला इन्टरफेअर करण्याची गरज नाही. आम्ही तिकडचे स्थानिक नगरसेवक आहोत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला चेणा ते उत्तनपर्यंत इन्टरफेअर करायचे असेल तर तुम्ही दादागिरी करणार तर असे चालणार नाही. जैसे पहले चल रहा था। वैसे अब नही चलेगा।

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब हे मंदिर होते ते तोडले. तर अन्य धर्मियांची प्रार्थना स्थळे असतील ना. आणि ती अन्य धर्मियांची प्रार्थना स्थळे आरक्षणामध्ये आहेत ती तोडून टाका.

**रोहिदास पाटील :-**

असे झाले तर चालेल.

**रतन पाटील :-**

तुम्ही फक्त मंदिरासाठी हा नियम लावू नका. सर्वांना सारखा न्याय लावा. जर तुम्ही अशी भूमिका घेतली तर आम्ही रस्त्यावर उतरु.

**एस. ए. खान :-**

सर्वांना सारखा न्याय लावा.

**रोहिदास पाटील :-**

हे असे कसे चालेल ? तुम्ही जो मंदिराचा ओटा तोडलेला होता. तो नवीन होता.

**फॅरा ग्रिटा :-**

ते बांधकाम जूने आहे की नवीन आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते गार्डनमध्ये आहे.

**मा. सभापती सो. :-**

याबाबत श्री. तायशेटे खुलासा करतील.

**फॅरो ग्रिटा :-**

ते बांधकाम जुने आहे की नवीन आहे. त्याचा शहनिशा करुन जुने आहे. त्याची शहानिशा करुन जुने आहे की, नवीन आहे त्याची खात्री करुन घ्या. नाहीतर असे कोणीही कुठेही बांधकाम करेल.

**मा. सभापती सो :-**

मंदिर तोडलेले नाही. फक्त नवीन ओटला तोडलेला आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही प्रथम सगळ्यांना न्याय मिळणार आहे का? ते सांगा. आणि नंतर बाकीचे बोला.

**संजय तायशेटे :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की त्याठिकाणी प्लॉटला गटाराचे काम चालू आहे. त्या गटाराच्या कामच्या अलाईनमेंटमध्ये बांध येत होता. मंदिर येत नव्हते. त्याच्यामुळे तो बांध तोडण्यात आलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अजुनपर्यंत शेड का तोडलेली नाही. तुम्ही काल जे निवेदन केलेले होते. तुम्ही ते निवेदन सभागृहाला सांगा किंवा ते निवेदनसुद्धा अनधिकृत आहे का? ते सभागृहाला सांगा. मी आयुक्तांची सही घेतो आणि बांधकाम तोडतो असे उत्तर दिलेले आहे. एका अधिका-याला ते बांधकाम अनधिकृत आहे असे माहिती पडले. मग तिथे विसंगती आहे किंवा विलंब का लागतो? असा या ठिकाणी प्रश्न उद्‌भवलेला आहे.

**संजय तायशेटे :-**

या मंदिराचा अर्ज आलेला आहे. आपण त्या अर्जाची साहेबांशी भेट घेउन मिटींग संपल्यानंतर त्यांना आदेश देतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आंम्हाला सांगा.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापतीसाहेब, मेरी यहाँपर ऐसी बिनती है की वह गटर बनाने के बादमें उसको वापस स्लॅब डालकर बनाके दे दो। पिछे गटर बनेगा।

**मा. सभापती सो. :-**

वह बांधकाम नया है क्या? वह पहले देखो। अगर नया गटर रहेगा और मंदिरके नामसे बढायेंगे तो मतलब क्या है?

**एस. ए. खान :-**

वह नया गटर है। वह पंधरा दिन पुराना गटर है। ते गटर नवीन आहे. आम्ही अठरा वर्षापासुन राहतो. आंम्हाला माहित आहे.

**मा. सभापती सो :-**

संबंधीत स्थानिक नगरसेवक आहेत. त्यांना माहिती असेल.

**एस. ए. खान :-**

त्यांनी नवरात्रीच्या वेळेला बनवलेले होते.

**फॅरो ग्रिटा :-**

याचा अर्थ ते नवीन आहे.

**एस. ए. खान :-**

आम्ही गार्डन आणि मैदान केले तर त्याच्यामध्ये ओटला बनवायचा का? उधर ओटला बनाया है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नवीन ओटला बनवलेला होता आणि तो ओटला नाल्यामध्ये येत होता. तो त्यांनी काढलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तसा प्रश्न नाही. सन्मा. सदस्य एस्. ए. खानसाहेब बोलतात की, ते मैदानाचे आरक्षण आहे. ते बरोबर आहे. जी जी मैदानाची आरक्षणे आहेत. ती तशीच राहिली पाहिजेत असे सर्वांचे मत आहे. त्याच्यामध्ये कुठेही मंदिर आले आणि तुम्ही त्या मंदिरावर कुरघोडी करित असाल किंवा मंदिर तोडत असाल तर अन्य दुसरी काही मंदिरे आहेत. प्रार्थना स्थळे आहेत. त्याच्यावरसुद्धा कार्यवाही व्हायला पाहिजे. मी ह्या मताचा आहे.

**एस. ए. खान :-**

त्याच्यावरसुद्धा कार्यवाही व्हायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे आरक्षणाचे गार्डन आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुंम्हाला आरक्षण क्र. १२२ बाबत दहा पत्रे दिलेली होती. तुम्ही ते आरक्षण का काढत नाही? महापालिकेला गोल्डन नेस्टजवळील फार मोठे मैदान पाहिजे आहे. तुम्ही त्याच्यावर कार्यवाही का करत नाही?

**रतन पाटील :-**

तुम्ही ते काढा. आपल्याकडे भरपूर आरक्षणे आहेत. मग या महापालिकेकडे काहीही राहणार नाही.

**संजय तायशेटे :-**

आम्ही त्याच्यावर कार्यवाही करणार होतो. परंतु, त्याच्यावर स्टे आहे. आम्ही तो स्टे उठवल्याशिवाय कार्यवाही करु शकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

रोज एक शेड बनते. त्याला स्टे असतो का?

**संजय तायशेटे :-**

श्री. राजकूमार तिवारीच्या जागेवर स्टे आहे. आम्ही त्याला.....

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही विषय मिक्स करु नका. मी आरक्षण क्र. १२२ म्हणजे गोल्डन नेस्टच्या सिग्नलबाबत बोलत आहोत. तिथे एक-एक करुन तीनच्या ठिकाणी सतरा बांधकाम झालेली आहेत. मा. सभापतीसाहेब तुम्ही

ते बघता. परंतु, ते बांधकाम कोण करतो? तिथे कोणाचे काम चाललेले आहे. तिथे कोण कोणाला ताबा देतो याची माहिती द्या.

**संजय तायशेटे :-**

श्री. राजकूमार तिवारीबाबत कोणी तक्रार केलेली होती? आम्ही आता श्री. तिवारीबाबत पत्र दिलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सोसायटीच्या विषय वेगळा आहे. मी आरक्षणाच्या विषयावर बोलत आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही श्री. तिवारी वगैरे कोणाला ओळखत नाही. आम्हाला महानगरपालिकेने आरक्षण मोकळे करुन द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

त्या ठिकाणी रोज नवीन बांधकाम करायचे आहे का?

**संजय तायशेटे :-**

रोज बांधकाम करायचे नाही. तुम्ही जे आधी कोर्टाचा आक्षेप घेतलेला होता. त्या आक्षेपाबाबत कोर्टाचे स्थायी आदेश आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मी जे सांगतो ते तुम्ही सांगतात. मी जर कथन करायला लागलो तर आणखी दहा मिनिटे लागतील. मी आता बोललो ते शहराच्या विकासाच्या दृष्टीने असेल तर ते आरक्षण क्र. १२२ चे आरक्षणाबाबत शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने आम्ही त्याबाबत दहा पत्रे दिलेली होती. ते आरक्षण मोकळे करा सांगितलेले होते. ते आरक्षण मोकळे करण्याऐवजी रूम वाढत चाललेले आहे. रूम का वाढला? मालक वाढले ही काय पद्धत झाली? श्री. शिवमूर्ती नाईकसाहेबांनी नवघर रोडला एक बांधकाम तोडलेले होते. तीन बॉक्स लागले हे काय चाललेले आहे? आम्ही प्रत्येकावर बोट ठेवणार नाही. परंतु, तुमच्या प्रशासनाची काहीतरी जबाबदारी आहे. मी इथे बसल्यानंतर कोणीही सांगेल की उभे रहा. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी तक्रार केलेली होती. तिथे रस्ते मोकळे होते. तेथील बांधकाम तोडलेले होते. आता ते बांधकाम बांधलेले आहे. ते बांधकाम का बांधलेले आहे?

**रतन पाटील :-**

आपल्या वकिलांची मिरा भाईंदरमध्ये फौज आहे. आपले वकिल काय करतात? आपले वकिल स्टे उठवू शकत नाहीत का?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ते निवेदन केलेले आहे. तुम्ही त्याच्यावर काय कारवाई करणार? तुम्ही आयविटनेस आहात. तुम्हाला ही केस नवीन नाही. पहिले बांधकाम तोडताना ते बांधकाम तुमचे होते. आतासुद्धा एक-दोन-तीन गाळे लागले. ते काढणार की नाही ते सांगा.

**संजय तायशेटे :-**

मी श्री. तिवारीचे बांधकाम आता जाउन बघतो. मग आपण त्याच्यावर कार्यवाही करुया.

**रतन पाटील :-**

साहेब, स्टे आहे का? ते समजण्यासाठी विधी अधिका-यांना बोलवा आणि नंतर कार्यवाही करु द्या.

**एस. ए. खान :-**

श्री. तायशेटे मी सुद्धा आता कमिशनरसाहेबांची ऑर्डर घेतो. आणखी कर्मचारीसुद्धा देतो.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, तुमच्या आणि आमच्या मध्ये अंतर नको आहे. जे काही सभागृहात ठरेल त्याचा पुढची सभा लागण्यापूर्वी आढावा घेतला पाहिजे. तुम्ही तातडीने एक दिवस आधी बैठक घ्या. तुमची गोची कशाला करुन घेता? तुम्हाला आम्ही तुमच्यावर ओरडतो असे वाटते. आम्हाला तुमच्या वर ओरडण्याचे काहीही कारण नाही. तुम्ही आम्हाला माहिती देत नाही. मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो, मा. आयुक्तसाहेबांना विनंती करतो, मा. सभापतीसाहेबांना विनंती करतो की, जे खरे आहे ते मा. आयुक्तसाहेब, मा. महापौर, मा. उपमहापौर आणि स्थायी समितीचे सभापती या चार लोकांनी आढावा घ्यायला पाहिजे होता. शासनाची येणारी पत्रे वेगवेगळ्या डिपार्टमेन्टची येणारी पत्रे ही तुम्हाला पाच लोकांना नक्की माहिती पडली पाहिजेत. हे तुमचे काम आहे. मुख्यालय, तुम्ही उप-आयुक्त आहात. तुम्हाला रेल्वेने काय पत्र दिलेले आहे? आज तुमच्या सगळे लक्षात आले असेल. भाईंदर(प) ची चौपाटी बंद होत आहे. तुमच्याकडे याचे पत्र आहे का? चौपाटीवर जे गणपती विर्सजन होते, गणगौर होते, पूजा होते हे धार्मिक म्हणजे दशक्रिया विधीचे काम या शहरात होते. जैन लोकांची जी रॅली असते. ती रॅली बंद होत आहे. त्याचे पत्र कोणाकडे आलेले आहे? आपल्याकडून उत्तर द्यायला पाहिजे. आता घाई करण्याचे काहीही कारण नाही. हे सगळे भावनेचे विषय आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती रेल्वेची जागा आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

रेल्वेचा रस्ता असल्यामुळे रेल्वे कधीही रस्ता बंद करु शकते.

**रोहिदास पाटील :-**

हे सभागृह सन्मानित आहे. स्थायी समिती, महासभा, आयुक्त, महापौर हे त्याच्यामध्ये हस्तक्षेप करु शकतात. आम्हाला रेल्वेने जी वर्षानुवर्षे वहिवाटीला रस्ता दिलेला आहे. त्या रस्त्यावर वहिवाटीच्या रस्त्याची दखल घेउन त्याचे आयोजन, नियोजन करावे असे आपले पत्र जाणे आवश्यक आहे. ते बरोबर आहे की चूक आहे. तुम्हाला त्याची जाणीव नाही. त्यांनी रस्ता बंद केला तर कोणी कुठे आंदोलन करायची? ते सांगा. सन्मा. सदस्या कैलासबेन जानी यांनी चौपाटी बचाव असे बोर्ड लावलेले आहेत. काल जवळजवळ २८०० लोकांनी सह्या केलेले होते. सन्मा. सदस्या कैलासबेन जानी माईक घेउन बसलेल्या होत्या आणि त्यांनी सह्या घेतलेल्या होत्या. आपल्या सर्वांचे काम आहे. काहीही आले तरी की तुम्ही आजच्या आज रेल्वेला व संबंधितांना पत्र लिहा की आमच्या भावनांचा आदर ठेवून आमचे धार्मिक विधी झाले पाहिजेत. आमचे धार्मिक विधी नियमानुसार चालले पाहिजेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

धार्मिक विधीच्या कार्यक्रमाचे जे पेन्डॉल टाकत होते. त्याला ते अडवत होते.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबितसाहेब तुम्ही दाखवलेल्या तत्परतेबद्दल तुम्हाला हे सभागृह धन्यवाद देते. आजच्या आज मा. आयुक्त साहेबांच्या सहीचे पत्र पाठवा की आमचे जे धार्मिक विधी चालू आहेत ते अबाधित राहिजे पाहिजेत. त्याच्यामध्ये अडचण येता कामा नये असे त्या पत्रामध्ये नमुद करा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, बरोबर कसे आहे? जर त्या ठिकाणी स्टे घेतला आणि उद्या काय झाले तर तो अधिकारी स्टे घेतलेला आहे असे बोलेल त्यापेक्षा तुम्ही त्या अधिकाऱ्यांना समक्ष बोलवा. त्याच्याशी चर्चा करा. परंतु, पत्र देउ नका किंवा अडचण करु नका. माझा पूर्वी रेतीचा धंदा होता. मला अनुभव आहे. गर्व्हमेंटने रस्ता बंद केला. दोघांनी डयुप्लीकेट रेव्हेन्यूच्या अधिकाऱ्यांना पैसे देउन तिथे धंदा सुरू केला. तो प्लॉट माझा होता. आपल्याकडील कार्यकर्ते आहेत. त्यांचे नाव श्री. दिपक कापडी आहे. तुम्ही त्या श्री. दिपक कापडींना बोलवा आणि विचारा. त्यांना रेल्वेला पैसे दाबून आमचा रस्ता बंद झालेला होता. तो चालू केला. कारण लोक पैसे खायच्या मागे लागलेले आहेत. तो प्लॉट आमचा होता. त्याच्यानंतर तो प्लॉट विकला गेला. काही लोकांनी पैसे कमावले. तिकडे अधिकाऱ्यांनी मनमानी चालते. प्लॉट घेणाऱ्यांना हा रस्ता रेल्वेचा असल्यामुळे कधीही बंद करु शकतो हे माहिती नव्हते.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्या नकळत प्लॉट विकला गेला.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या ठिकाणी श्री. केसरीनाथ म्हात्रे बसलेले आहेत. त्यांना माहिती आहे. त्यांचासुद्धा प्लॉट होता. आमचा पूर्वी धंदा होता. तो रेल्वेने बंद केला. आम्ही त्या रस्त्यासाठी स्वतः खर्च केलेला होता.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आमची या ठिकाणी अशी विनंती आहे की मला रोज पत्र देण्यामध्ये इन्टरेस्ट नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही अधिकाऱ्यांना बोलावून चर्चा करा. आपली चौपाटी बंद होता कामा नये. संबंधित अधिकाऱ्यांना बोलवा. संबंधित अधिकाऱ्यांनी संबंधित विषय आहे. तुम्ही चर्चा करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या रेल्वेच्या ठिकाणी जी पश्चिम चौपाटी आहे. त्याचा विद्यमान वापर कायम राहण्याच्या अनुषंगाने त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून चर्चा करू.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२८ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

पान क्र. ७ वर आपले जे रेसिडेन्शियल रुम आहेत. त्याच्यामध्ये व्यावसायिक स्वरुपाचा वापर केला जात आहे. पान क्र. ९ वर जे आपले रक्षण करण ऐवजी रक्षण करणार असे वाक्य आहे. हे आपले महापालिकेचे नुकसान होणार असे शब्द आहे. कारण जर आपण घरपट्टी वसूल केली नाही तर आपल्या महापालिकेचे नुकसान होणार आहे. पान क्र. १७ वर मा. सभापतीसाहेब, आपण ह्याच्यामध्ये शिस्त मोडून टाकली असे आहे. पान क्र. २६ वर रस्त्याचे खांबे नसून थांबे असा शब्द पाहिजे.

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा ह्यांनी प्रकरण क्र. १२८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

सदरचे इतिवृत्त मंजूर झालेले आहे. त्याबद्दल माझी एक शंका आहे. त्यांनी जे मागील दि. ३१/७/२००६ मध्ये जो विषय घेतलेला होता. त्याच्यामध्ये प्रशासनाने त्रैमासिक अहवाल दिलेला आहे. त्याच्यामध्ये टॅक्सबाबत भरपूर चर्चा झालेली होती. मी त्याबाबत चर्चा करु इच्छितो. जर तुमची परवानगी असेल तर सांगू इच्छितो की आपण जो टॅक्स घेता त्याचे बजेट टॅक्सवर अवलंबून असते. आपले बजेट वाढत नाही. आपण त्यादिवशी बरीच चर्चा केलेली होती. आपले जे इंडस्ट्रीयल गाळे आहेत. त्याच्या खालच्या भागात टॅक्स लावलेला आहे आणि वरचे जे दोन मजल्याचा सर्व्हे झाला की नाही की सर्व्हे करायचा आहे. आपले जे हॉटेल आहे. त्या हॉटेलवाल्यांनी पावसासाठी वेदर शेड बांधलेली आहे. ती कायमस्वरुपी ठेवलेली आहे. ती काढली का? त्याला टॅक्स लावला तर आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल. आपण टॅक्स लावला तर ते अधिकृत होणार नाही. परंतु, त्यांचा जो फायदा आहे. तो महापालिकेला होईल.

**मा. सभापती सो. :-**

टॅक्स लावला तर म्हणजे आपण एवढया वर्षाचा टॅक्स भरतो तर ते अधिकृत झाले.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, अशी कुठलीशी चर्चा झालेली नाही.

**मा. सभापती सो. :-**

आज किंवा उद्या १०-१५ वर्षे झाली तर ते अधिकृत आहे. ती लोक एवढी वर्षे टॅक्स भरतात. मग ते अधिकृत झाले.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, त्याबाबत प्रशासनाने काय केले? होर्डिंगसुद्धा नाहीत. त्यांनी होर्डिंसाठी कार्यवाही केली की नाही.

**मा. सभापती सो. :-**

आपण त्या विषयावर नंतर चर्चा करुया.

**शशिकांत भोईर :-**

त्याचप्रमाणे आज आम्हाला सभागृहात येउन दोन महिने पूर्ण झाले. परंतु, आमचे इतिवृत्त आजपर्यंत आलेले नाही.

**मा. सभापती सो. :-**

पुढच्या वेळेला तुमचे इतिवृत्त येईल.

**शशिकांत भोईर :-**

तुमच्याकडे क्लार्क वगैरे कमी आहे का? क्लार्क वगैरे लवकरात लवकर आणले तर बरे होईल. नाहीतर आम्ही मागचे इतिवृत्त पास करतो. याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी. आपण मागच्या वेळेला मैदान, शाळा वर्ग व हॉल भाडयाने देणेबाबत ठराव पास केलेला होता. आपण त्याच्यामध्ये एक सुधारणा करायची होती की, सुट्टीचे दिवस आणि सुट्टीच्या वेळेत मैदान भाडयाने देणे.

**मा. सभापती सो. :-**

आम्ही तशी सुधारणा केलेली आहे.

(नगरसचिवांनी ठराव क्र. ४६ चे सभागृहासमोर वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

शाळा चालू असताना दुकाने लावता येणार नाहीत की कायमचे लावता येणार नाहीत ते सांगा.

**नगरसचिव :-**

शाळेच्या वेळेत दुकाने लावता येणार नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

आता श्री. पानपट्टेसाहेब आलेले आहेत. हा नागरिकांच्या भावनेचा विषय आहे. आपल्या शहरामध्ये जे अंबामातेचे मंदिर आहे. त्याच्यापुढे मटणाचे दुकान आहे. तुम्ही ते दुकान बंद का करु शकत नाही? ते जुने दुकान आहे. त्या ठिकाणी तीन नवीन दुकाने आहेत. मी तुम्हाला तक्रार करित नाही. एकाची चार दुकाने झाली म्हणून मी तुम्हाला तक्रार केली. एक दुकान होते तेव्हा मी तक्रार केलेली नव्हती.

**मा. सभापती सो. :-**

श्री. पानपट्टेसाहेब दुकान बंद करुन घेणार आहेत.

**प्रकरण क्र. १२८ :-**

दि. ३१/०७/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १३२ :-**

दि. ३१/०७/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ग्रिटा फॅरो.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२९ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की सदर लाल माती टाकण्याच्या संदर्भात त्याचे भाव दिलेले आहेत. परंतु, हा गोषवारा थोडासा अपूर्ण आहे. आपल्याला ह्याबाबत किती खर्च अपेक्षित आहे. त्याची अमाउन्ट दिलेली नाही. ती अमाउन्ट एकदा जाहिर करावी. खडी किती लागली वगैरेचा खर्च आपल्याला अपेक्षित आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रु. १७ लाखाचे एस्टिमेंट करण्यात आलेले आहे.

**हंसूकूमार पांडे :-**

रु. १७ लाखाचे एस्टिमेंट आहे. मग तिथे चांगली माती टाका. ते ट्रॅक ऑलिम्पिकसाठी चांगले बनवा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तिथे माती टाकताना शिलोत्री लोकांनी आक्षेप घेतला तर काय करणार?

**शशिकांत भोईर :-**

परंतु, तेथील नागरिकांचे काय?

**जयंत पाटील :-**

श्री. खांबितसाहेब तुम्ही ते मैदान वाढवणार आहात की त्याच्यावर माती टाकणार आहात ते सांगा.

**दिपक खांबित :-**

मैदान वाढवणार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मैदान वाढवताना जी मिठागराची जागा आहे. त्या लोकांनी ऑब्जेक्शन घेतले तर त्याला जबाबदार कोण आहे?

**रोहिदास पाटील :-**

माती काढतात आणि ती माती टाकतात. मग पुन्हा भरणी होते.

**दिपक खांबित :-**

जर ती माती जास्त असेल तर साईडला टाकतात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ती माती साईडला टाकतात.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही लेव्हल करता? लाल माती टाकून भरणी करता. तुमची एवढी मोठी जागा आहे. तुम्ही ती पुन्हा रफ करता.

**मा. सभापती साो. :-**

लाल मातीचा थरसुद्धा टाकतात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही ह्याच्यामध्ये साईडलासुद्धा वाढवा.

**रतन पाटील :-**

साईडला ढिगारे लागले तर वाढेल.

**रोहिदास पाटील :-**

शिलोत्री संघाची तक्रार आहे. आपले जे मैदान आहे ते मैदान निटनेटके करुन घ्या. उगीच वादविवाद करु नका. ते मैदान वाढीव नाही. आपले जे मैदान आहे. तुम्ही त्या मैदानाची उंची वाढवत आहात का?

**दिपक खांबित :-**

ते वाढीव मैदान नाही. पाठीमागच्या भागावर काम करायचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते मैदान वाढवायला कस्टमचा विरोध आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपण ज्या वेळेला लाल मातीचा भराव करणार होतो. आपण लेव्हलने करा. कारण दरवर्षी आमच्या मिरा भाईंदरचा कला क्रिडा महोत्सव असतो. आपल्या या ऑलिंपिकमध्ये रनिंगचा ४००चा ट्रॅक असतो. तो कायमस्वरुपी झाला पाहिजे. आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये ऑलिंपिक प्लेअर त्यांना ४००चा ट्रॅक नाही. त्यांना वेडेवाकडे धावावे लागते. आपण माती भराव करणार तर ती ४००च्या ट्रॅकवर असा भराव करा की दोन गाड्या असतील तर दोन गाड्या माती भराव करायचा म्हणून करु

नका. अशी माझी तुंम्हाला विनंती आहे. मी मध्यंतरी श्री. गणेश पाटीलसाहेबांना बोललो होतो. मागच्या वेळेला श्री. खतगांवकरसाहेब ट्रॅक असताना आलेले होते. तुम्ही मागच्या वेळेला आले होते तेव्हा तो ट्रॅक तसाच होता. आमच्याकडे ४००चा ट्रॅक बरोबर बसत नाही. तुम्ही ४००चा ट्रॅक करेल असा माती भराव करा. मिरा भाईंदर परिसरामध्ये जेवढे ऑलिंपिकचे मैदान आहे. त्याबाबत गेल्या वर्षी सांगितलेले होते. आता सुद्धा सांगतो की, आवश्यकता भासली तर मी नगरसेवक नसुन नागरिक या नात्याने तुंम्हाला माझ्याकडून जेवढी मदत लागेल मी ती करेन. तुंम्हाला ४००चा ट्रॅक आखून देतो. परंतु, माती भराव लेव्हलने चांगला झाला पाहिजे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांची सुचना नोंद करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या मिरा भाईंदरमहानगरपालिकेचा कला क्रिडा महोत्सव जवळ येत आहे. त्याची २३ की २४ तारिख दिलेली आहे याच्यापूर्वी जी काही सुधारणा करता येईल ती करावी. तिकडे माती भराव करण्याची सुरूवात करावी. मातीमध्ये दगड कमी असावे आणि माती जास्त असायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये दोन्ही गोष्टी क्लिअर व्हायला पाहिजेत. सुरूवातीला ह्याला स्थायी समिती प्रशासकीय मंजूरी देत असतांना हे एक्सटेन्शनसाठी दिलेले आहे. आपल्याला ती जागा मिळेल. ती जागा ग्राउंडला पुर्ववत करावी. यासाठी हे मॅटर सुरूवातीला आलेले होते.

**शशिकांत भोईर :-**

आता जागा उपलब्ध करुन ४०० चा ट्रॅक होत आहे. त्याच्यामध्ये माती भराव व्यवस्थित केला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा विषय माती भरावासाठी होता.

**फॅरो ग्रिटा :-**

हा विषय वाढीवसाठीसुद्धा होता ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सुरुवातीला हा विषय वाढीवसाठीसुद्धा होता.

**फॅरो ग्रिटा :-**

त्याच्यावर कोणी ऑब्जेक्शन घेतले तर तुम्ही काय करणार?

**रोहिदास पाटील :-**

जर वाढीव असेल तर वादाचा विषय होईल.

**फॅरो ग्रिटा :-**

वाढीवमध्ये वादाचा विषय होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये वाद न होता लोक जे शक्य आहे तेवढेच काम करावे.

**रोहिदास पाटील :-**

लोकांच्या मागे लागले आणि कोणी स्टे घेतला तर अडचण निर्माण होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता ते ग्राउंड लेव्हलमध्ये आहे. त्याचा इश्यु नाही.

**दिपक खांबित :-**

ते वाढीव नाही.

**शशिकांत भोईर :-**

काही ठिकाणी खाचखळगे आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याला तेवढा खर्च येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही किंवा श्री. गणेश पाटील यांनी वाढवलेला आवश्यक तो खर्च घ्या. तुम्ही आंम्हाला सगळया बाजू सांगू नका. तुम्ही वाढीव करायला जाल तर खर्च वाढत जाईल. तुम्ही आता हे सगळे बघुन माहिती घ्या. आपले वकिल बसलेले आहेत. एक स्टे आणला की सगळे काम बिघडले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याठिकाणी वाढीव न करता आहे ते खाचखळगे बुजवून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

वाढीव काम न करता त्या स्टेडियमचा दर्जा कसा सुधारता येईल किंवा ते स्पोर्टचे कार्यक्रम करतात. त्यांना विश्वासात घेउन आवश्यक ती सुधारणा करायला पाहिजे. अंदाजपत्रकामध्ये जी तरतुद पाहिजे तुम्ही ती घ्या. ते काम करा वाद करायला कोणीही कोर्टात जातात आणि स्टे घेतात. चांगले काम तिकडूनच जाते.

**फॅरो ग्रिटा :-**

वाढीव असेल तर त्याला नंतर ऑब्जेक्शन घेणारच. मग वादविवाद कशाला?

**रोहिदास पाटील :-**

ह्याचा ठेकेदार कोण आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याचा ठेकेदार आयकॉन आहे. श्री. गणेश पाटील हा निविदा मंजुरीचा ठराव आहे. त्याच्यामध्ये हे करता येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपण ८०६ ला मंजुरी देतो. ही लाल माती आहे. त्याच्यामध्ये एवढे दगड आहेत.त्याच्यावर लक्ष देणारा ठेकेदार कोण आहे? म्हणजे १६०० रु. ची गाडी आली. या १६०० रु. च्या गाडीमध्ये लाल माती मिळते. आता जिथे लाल माती पडलेली आहे. तिथे एवढे मोठे - मोठे दगड पडलेले आहेत. हे काय आहे?

**जयंत पाटील :-**

१६०० रु. मध्ये दगड घेत आहे की माती घेत आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण फक्त माती घेतो.

**जयंत पाटील :-**

आम्ही स्थायी समितीचे सदस्य लाल माती बघायला येउु. आंम्हाला लाल माती पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

आम्ही त्या ट्रॅकवर धावणार आहोत असे सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुमचा मुद्दा विचारात घेतलेला आहे. वाद न होता. आपल्याला जितक्या ग्राउंडमध्ये लेव्हल भरता येईल.

**रोहिदास पाटील :-**

तो विषय संपला. तुम्ही विषय वाढणार नाही त्याच्यावर आम्ही विश्वास ठेवलेला आहे. आता असा विषय आहे की, ८०६ रू. ब्रासला आयकॉन इंजिनियर नावाचे कोणीतरी ठेकेदार आहेत. आपण त्यांना देतो. एक म्हणजे १६०० रु. ची गाडी झाली. तर त्याच्यामध्ये २००० रु.ची गाडी झाली. त्याच्यामध्ये भरपूर दगड पडलेले आहेत. मी सकाळी जाउुन आलो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जी माती आलेली आहे ती संपूर्ण माती आहे. मी स्वतः बघून आलेलो आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण सभा संपल्यावर बघायला जाउुया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्वात शेवटी त्या भागात ती माती टाकलेली आहे ती माती आहे. फक्त दोन ते तीन थर माती पडलेली आहे. मी स्वतः बघून आलेलो आहे.

**रोहिदास पाटील :-**

कोणासाठी तरी तुम्ही डोक्यावर कशाला घेता पाटी?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे काम कस्टमचे आणि आपल्याला शिलोत्री मंडळाने सहकार्य केले ते बाउंड्रीपर्यंत करायचे असेल तर वाद निर्माण होईल असे कोणतेही काम केले जाणार नाही.

**रतन पाटील :-**

वाद होईल आणि ते काम थांबले असे काम करु नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बेसिकली मी खुलासा केलेला आहे. हा नवीन लेव्हलचा विषय नाही. आपल्याला एक्सटेन्शन करण्याचा विषय होता. आपल्याला जागा व्यापायची होती. त्याठिकाणी खुप मोठ्या प्रमाणात विरोध होता. हे काम तेवढे होणार नाही.

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा ह्यांनी प्रकरण क्र. १२८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर आहे.

**प्रकरण क्र. १२९ :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात लाल माती टाकून सुस्थितीत करून घेणेबाबत आलेल्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १३३ :-**

मा. आयुक्त सो., यांचा या संबंधीत गोषवारा वाचन केला.

महापालिकेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान सुस्थितीत करण्याच्या व मैदानाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने लाल माती पुरवठा अंदाजपत्र खर्च रुपये १७ लक्ष करण्यासाठी दि. २७/०७/२००६ च्या ''दैनिक महाराष्ट्र जनमुद्रा'' या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. यानुसार खालील प्रमाणे निविदा मुदतीत आल्या आहेत.

| ठेकेदाराचे नांव | दर (प्रति ब्रास) (रुपये) |
|---|---|
| पारस कन्स्ट्रक्शन | ८१५/- |
| ॲकॉन इंजिनियर्स | ८०६/- |
| गणेश डेव्हलपर्स | ८२२/- |
| शिवम कन्स्ट्रक्शन | ८३८/- |

वरीलपैकी मे. ॲकॉन इंजिनियर्स यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मा. आयुक्त सो. यांनी मंजुरीस शिफारस केली आहे. त्यानुसार कमी दराच्या ''मे. ॲकॉन इंजिनियर्स'' यांच्या निविदेस मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३० चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या श्री. शशिकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. १३० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रविंद्र माळी :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर आहे.

**रोहिदास पाटील :-**

प्रकरण क्र. १३० मध्ये दुरुस्ती काढलेली आहे. त्याच्यामध्ये हे काय लिहिलेले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दुरूस्ती झालेली नाही. एकच गोषवारा आहे. त्यांनी एका गोषवाऱ्यामध्ये चूकून काही टाईप केले होते.

**रोहिदास पाटील :-**

किती साहित्याला मंजूरी येणार आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दाहा लाखाच्या साहित्याला मंजूरी द्यायची आहे. मी यादी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ती संख्या काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण आवश्यकतेप्रमाणे घ्यायचे आहे.

**प्रकरण क्र. १३० :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत. (संगणक विभाग)

**ठराव क्र. १३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील संगणक प्रिंटर्स करिता लागणारी कंज्युमेबल स्टेशनरी खरेदी करणे कामाच्या निविदेची (कराराची) मुदत संपलेली आहे. सदर साहित्याची दैनंदिन कामकाजाकरिता नितांत आवश्यकता लागते.

संगणक कंज्युमेबल स्टेशनरी खालीलप्रमाणे खरेदी करावी लागणार आहे. त्याकामी खरेदीखर्च रु. १० लाखापेक्षा जास्त होणार असुन याकामी 'अ' १ सामान्य प्रशासन ३ संगणक खरेदी/प्रशिक्षण या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे.

| अ. क्र. | तपशिल |
|---|---|
| 1 | Floppy |
| 2 | Cdr |
| 3 | Cdrw |
| 4 | Magnetic Tap |
| 5 | Toner Hp LaserJet 1015 (Q2612A) |
| 6 | Toner Hp LaserJet 1015 (Q2612A) Refill |
| 7 | Line Matrix Printer (Gen-Printronix Ribbon P5000) New |
| 8 | Line Matrix Printer (Gen-Printronix Ribbon P5000) Refill |
| 9 | Tonner Hp LaserJet 2300n (Q2610A) New |
| 10 | Tonner Hp LaserJet 2300n (Q2610A) Refill |
| 11 | Tonner Hp LaserJet 9000n New |
| 12 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (56) New |
| 13 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (57) New |
| 14 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (58) New |
| 15 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (27) New |
| 16 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (20) New |
| 17 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (49) New |
| 18 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (28) New |
| 19 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (57, 57,58,27,20,49,28) (Ink) Refill |
| 20 | Dust Cover |
| 21 | PC Monitor Glass |
| 22 | Epson/Wipro Lx 1170 (132) Ribbon New |
| 23 | Epson/Wipro Lx 300 (80) Ribbon New |
| 24 | Epson/Wipro Lx 1170 (132) Ribbon Refill |
| 25 | Epson/Wipro Lx 300 (80) Ribbon Refill |
| 26 | 132 Column Plastic File |
| 27 | 80 Column Plastic File |
| 28 | Samsung 2250 ML |
| 29 | Samsung 2250 ML (Refill) |
| 30 | 11A (Yellow), (Magenta), (Cyan) |
| 31 | 10A (Black) |
| 32 | Pen Drive (512 MB) |

वरीलप्रमाणे कंज्युमेबल स्टेशनरी खरेदी करणेस व त्याकामी लागणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. रविंद्र माळी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३१ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. रविंद्र माळी ह्यांनी प्रकरण क्र. १३१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपायुक्तसाहेब, सदर ठराव मंजूर झालेला आहे. तुम्ही फक्त ठराव मंजूर करुन घेणार आहे की, त्याचे एक्झिक्युशन करुन घेणार आहात ते सांगा. आंम्हाला एल. सी. डी. पाहिजे म्हणून आम्ही एल. सी. डी. घ्या असे सांगितले होते. हे कशासाठी आहे.

**मा. सभापती सो. :-**

एल. सी. डी.चे काय झाले? ते मला समजत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. म्हात्रे, ती फाईल कुठपर्यंत आलेली आहे? ते सांगा. आणि पुढच्या सभेला तो विषय १०० टक्के मंजुर करुन ठराव यायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

कोणीही आवश्यक त्या कामासाठी भाडयावर खरेदी करणे असे पाहिजे. कदाचित तुंम्हालाही ते मिळणार नाही. तो विषय येणार नाही. आंम्हाला जी एल. सी. डी. पाहिजे ती एल. सी. डी. तुमच्याकडे येत नाही. काल एक एल. सी. डी. हाती ती शोधा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बी. एम. सी. मध्येसुद्धा एल. सी. डी. आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण सर्वत्र एकत्र बसतो. आपल्याला सगळ्यांना देवाण - घेवाण करायची आहे. ही ज्ञानाची गोष्ट आहे. ती एल. सी. डी. तुमची असेल तर घेउन या आणि तिथे पडदा टाका. तिथे काय आहे? ते आंम्हाला दाखवा. आपल्या स्थायी समितीची एल. सी. डी. असायला पाहिजे.

**प्रकरण क्र. १३१ :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत. (संगणक विभाग)

**ठराव क्र. १३५ :-**

महानगरपालिका कर विभाग, नागरी सुविधा केंद्र, पाणी पुरवठा इत्यादी विभागातील संगणकीकृत देयके, पावत्या, मागणी रजिस्टर, आकारणी रजिस्टर व इतर छपाई करिता लागणारी प्लेन व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे कामाच्या (कराराची) मुदत संपलेली असून सदर साहित्याची दैनंदिन कामकाजाकरिता नितांत आवश्यकता लागते.

संगणक प्लेन व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी खालीलप्रमाणे खरेदी करावी लागणार आहे. त्याकामी खरेदी खर्च रु.१०.०० लाखापेक्षा जास्त होणार असून याकामी अ-१ सामान्य प्रशासन ३) संगणक खरेदी/प्रशिक्षण या लेखाशिर्षात तरतूद उपलब्ध आहे.

| अ. क्र. | तपशिल |
|---|---|
| 1 | Plain 80 Column Stationary I Part (60 GSM) |
| 2 | Plain 80 Column Stationary II Part (60 GSM) |
| 3 | Plain 132 Column Stationary I Part (60 GSM) |
| 4 | Plain 132 Column Stationary II Part (60 GSM) |
| 5 | Plain 132 Column Stationary III Part (60 GSM) |
| 6 | Pre Printed 80 Column Stationary I Part (70 GSM) |
| 7 | Pre Printed 80 Column Stationary II Part (60 GSM) |
| 8 | Pre Printed 132 Column Stationary I Part (70 GSM) |
| 9 | Pre Printed 132 Column Stationary II Part (60 GSM) |
| 10 | Pre Printed (Both Side) As Per Programme Setting A4 (85 GSM) |
| 11 | Pre Printed (Single Side) As Per Programme Setting A4 (85 GSM) |
| 12 | Computer Use Branded Co. A4 Plain Papers (80 GSM) 500 Papers Each Packet |
| 13 | Computer Use Branded Co. A4 Ex Bond Papers (70 GSM) 500 Papers Each Packet |
| 14 | Computer Use Branded Co. A4 (Alabaster) (90 GSM) 500 Papers Each Packet |
| 15 | Laser Paper (90 GSM) 500 Papers Each Packet |
| 16 | Computer Use Branded Co. A3 Plain Papers (80 GSM) 500 Papers Each Packet |

वरीलप्रमाणे प्लेन व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणेस व त्याकामी लागणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रविंद्र माळी. अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३२ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

आपण ह्याच्यावर भाव निश्चित केलेला आहे. २७० ने घेणार आहे. त्याच्यामध्ये किती खर्च अपेक्षित आहे ते दिलेले नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

अपेक्षित खर्च म्हणजे मागच्या वर्षी २५ लाख रु. खर्च झालेला आहे. मागणी कधीही फिक्स नसते. टँकरची किंमत ५० रु. ते १०० रु. असते. मागच्या वर्षी २५ लाख रु. खर्च झालेला आहे.

**रतन पाटील :-**

आपण तरतुदीच्या हिशोबाने खर्च करित नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण मागच्या वर्षी तरतुदीच्या हिशोबाने २५ लाख रु. खर्च केलेला होता.

**रतन पाटील :-**

आता किती खर्च झालेला आहे? आपली वार्षिक निविदा आहे. त्याची मागणी फिक्स नसते. आपले जसे टँकर येतात. आपण त्याप्रमाणे खर्च ठेवतो. मागच्या वर्षी २५ लाख रु. खर्च झालेला होता.

**रतन पाटील :-**

आम्ही काय समजायचे? आम्ही कशाला खर्च द्यायचा.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्याकडे वार्षिक निविदा आहे. आपण वार्षिक निविदेला मंजुरी द्यायची आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही याला कुठल्या हिशेबाने मंजुरी द्यायची ते सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्याला ठरावाला मंजुरी द्यायची आहे.

**रतन पाटील :-**

किती रकमेची तरतुद आहे? त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे त्याचा गोषवारा आहे.

**रोहिदास पाटील :-**

अंदाजपत्रकामध्ये तरतुद आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

रू. ५० लाखाची तरतुद आहे. ते खर्चाबाबत बोलतात तर खर्च रू. २५ लाख झालेला आहे. आपल्याकडे रू. ५० लाखाची तरतुद आहे त्याची फिक्स डिमांड नसते.

**रतन पाटील :-**

आपण त्या तरतुदीप्रमाणे खर्च करायचा.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण तरतुदीप्रमाणे खर्च करणार आहोत.

**एस. ए. खान :-**

तुम्ही टँकरवाल्यांना रू. २७० प्रमाणे टँकर देणार आहात का?

**शिवाजी बारकुंड :-**

मिरा भाईंदर मनपा क्षेत्रामध्ये महापालिका सांगेल त्या ठिकाणी टँकर टाकायचे.

**गिता जैन :-**

साहेब, आपल्याकडे एकही टँकर नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण टँकर घेतो. आपण त्याचे भाडे घेतो.

**गिता जैन :-**

आपण टँकर का घेत नाही? आपल्याला एवढी मागणी कशी परवडते?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण एकंदरीत नगरपालिकेकडून थोडीशी हिस्ट्री बघता. स्वतःचे टँकर घेणे परवडणार नाही आर्थिक क्षेत्रामध्ये शक्यतो नाही.

**गिता जैन :-**

आपल्याकडे वाहने पडलेली आहेत. आपल्याला ते परवडते का?

**शिवाजी बारकुंड :-**

मी सन्मा. सदस्यांना विनंती करतो की मला बऱ्याच नगरसेवकांचे रात्री १०.०० किंवा १२.०० वाजता फोन येतात. जर एकदा असे निदर्शनास आले तर तुम्ही मला दुरध्वनी वरून कल्पना द्या मी टाकीवर जाउन व्यवस्था करतो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही मला माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. तो प्रश्न साहेबांच्या लक्षात आलेला आहे. जेव्हा नागरिक टँकरची मागणी करतात. फाटकावर जातात. परंतु, तिकडे टँकर बुक आहे असे सांगितले जाते. आता आमच्याकडे भरपूर लाईन आहे. तुम्ही उद्या या. तेच टँकर बाहेरून रू. २२५/- ते रू. ३२५/- ला मिळत असेल तर रू. ५००/- किंवा रू. ५५०/- किंवा रू. ४००/- ला तोच टँकर ताबडतोब मिळतो.

**शिवाजी बारकुंड :-**

यापुढे याबाबत अतिशय दक्षता घेण्यात येईल. जर असे काही निदर्शनास आले तर संबंधित कर्मचाऱ्यावर कार्यवाही करू.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला टेंन्डर रद्द करावे लागेल.

**गिता जैन :-**

टेंन्डर रद्द करा.

**शिवाजी बारकुंड :-**

जर आपल्या असे निदर्शनास आले तर आपण टेंन्डर रद्द करण्याची अट टाकूया.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला एक गोष्ट निदर्शनास आणून देतो की आपण एक टँकर देणार. परंतु, आपल्या महापालिका हद्दीमध्ये पाणीपुरवठा जलवाहिनीवर कुठेतरी पम्प लावल्याचे तुमच्या निदर्शनास आलेले आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

मी हा विषय संपल्यानंतर त्याची माहिती देतो. त्यामुळे हा विषय संपल्यानंतर चर्चा करूया.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय मंजुर आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही कामाबद्दल दखल घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. बारकुंडसाहब, पानी बहूत कम आ रहा है।

(सन्मा. सदस्य श्री. परशुराम म्हात्रे यांनी प्रकरण क्र. १३२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण नागरिकांकडून शूल्क किती वसूल करणार आहोत? नागरिकांकडून किती वसूल करणार आहात.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण नागरिकांकडून रू. ३२५ आकारतो.

**जयंत पाटील :-**

परंतु, दोघांच्या निविदा समान आहेत. तुम्ही दोघांना दिल्या का?

**शिवाजी बारकुंड :-**

हा पाण्याचा विषय आहे. त्यामुळे दोघांच्या निविदा दिलेल्या आहेत. जर एखाद दिवशी प्रॉब्लेम निर्माण झाला तर आपल्याकडे दोन एजन्सी असतील तर आपल्याला एकावर डिपेन्ड न राहता. आपली कुठलीही सर्व्हिस चालू राहू शकते.

**एस. ए. खान :-**

दोन्ही निविदा वेगवेगळ्या आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

अभी मैने श्री. शेखसाहबको दिया था। अभी वह भेजेंगे। आप यह क्या बात कर रहे है। मैने बोला की आवाज नीचे करके बात करो। जोरसे बात मत करो। हम लोग आपका सुनने के लिये नही आये है। टँकर का भाव ऐसे चलता है। क्या? हमारा सुबह ११.०० बजे का नंबर था। अभी रात २.०० बजे तक टँकर क्यो नही आया। दिनभर टँकर ऐसेही जाते है और रातको टँकर नही भेजते है। आम्ही लोकांचे हे आरोप नगरसेवक या नात्याने ऐकतो. तुम्ही या ठिकाणी अंदाजे रक्कम लिहिलेले आहे का? ते बघा या ठिकाणी फक्त टँकरचे भाव लिहिलेले आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

आता सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी प्रश्नाचे जे उत्तर दिले. त्याच्यामध्ये सर्व काही आलेले आहे. रू. २५ लाख हा सर्व साधारण खर्च आहे. त्याबाबत टँकरची डिमांड फिक्स नाही. तुम्ही आता दुसरा प्रश्न विचारला. त्याबाबत मी असे सांगेन की आपल्याकडे सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत एक लिपिक असतो. रात्री नाईट शिफ्टला आपले सफाई कामगार असतात. त्यांना लिपिक नेमण्यासाठी व्यवस्था केली जाईल तिथे रात्रिसुद्धा लिपिक असेल मग व्यवस्थित होईल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

रात्रीच्या वेळेला एक कर्मचारी होता. तो मी रात्री पावत्या फाडणार की टँकर बघणार असे बोलत होता. त्यामुळे पावत्या फाडणार की टँकर बघणारे याबाबत नेहमी बोंबाबोंब होते. आम्ही याबाबत श्री. बारकुंड यांना सांगून तीन महिने झालेले आहेत. जर व्यवस्था होत नसेल तर आम्ही काय करणार?

**शिवाजी बारकुंड :-**

तिथे व्यवस्था आहे. कर्मचारीसुद्धा आहेत. पावत्या ह्या दिवसा फाडल्या जातात आणि ४.०० वाजल्यानंतर पावत्या बंद होतात. रात्रीच्या वेळेला लिपिक नसतो. तिथे व्हॉल्व्हमेन मधील कर्मचारी असतो आता तिकडे लिपिक ठेवला जाईल.

**एस. ए. खान :-**

रात्रीच्या वेळेला सुद्धा लिपिक द्या म्हणजे पावत्या फाडणे बरे होईल.

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, तिथे दोन - अडीच महिन्यापासून पाण्याचे कनेक्शन खराब झालेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही चिंता कशाला करता? टँकरचे रू. ३२५/- घेतात. आपले त्याच्यामध्ये नुकसान होत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, पानी की पोझीशन पिछले दो - अढाई महिने से खराब है। आप रोज सुनते है की आज पोझीशन मे सुधार होगा, कल पोझीशनमे सुधार होगा। लेकीन पानी की पोझीशन सुधरती नही है। पानी ८६ एम.एल.डी आता है।

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या दोन महिन्यापुर्वी पाण्याची पोझीशन खराब होती. आता पाण्याची पोझीशन सुधारलेली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

पाण्याची पोझीशन कधी सुधारली? आमच्या प्रभाग क्र. ८ मध्ये पाण्याची पोझीशन तशीच आहे. आम्ही खुप वेळा फोन केलेला होता.

**शिवाजी बारकुंड :-**

तो टेलियन्टचा भाग आहे. आपण काही ठिकाणी पाईपलाईन बदललेली होती. आपण स्वतः ज्वाईंटली व्हिजीट केलेली होती.

**हंसुकुमार पांडे :-**

आपण व्हिजीट केलेली होती. परंतु, तरीसुद्धा पाणी येत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

पाण्यामध्ये सुधारणा होईल.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब पाणी येत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मी तुम्हाला पाण्यामध्ये सुधारणा होईल असे सांगितले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही आलेले होते, तुम्ही श्री. निशांत जाधव यांना बोलावलेले होते. तुम्ही श्री. नेमाळे साहेबांना बोलावले होते. परंतु, पाण्यामध्ये सुधारणा झालेली नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मी सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की निश्चितच सुधारणा होईल.

**हंसुकुमार पांडे :-**

आज चार साल हो गये है। लेकीन हम लोगोने कभीभी पानी के बारे मे कम्प्लेन्ट नही की है। मेरी कम्प्लेन्ट नही थी। इसलिये मैने कम्प्लेन्ट नही की। अब कम्प्लेन्ट है तो मै कम्प्लेन्ट करता हूँ। सिर्फ मेरे प्रभाग मे पानी की समस्या नही है। लेकिन हम लोग हमेशा यह पाईप लाईन टूट गयी है इसलिये पानी कम ही आ रहा है ऐसे नही सोचते है। आज १ एम.एल.डी. पानी चोरी हो गया ऐसा है। आप पानी चोरी की बात करते है। मगर पानी किधर चोरी होता है वह बताईये।

**शिवाजी बारकुंड :-**

तो लॉसेस आहे. आपण त्याला चोरी बोलू शकत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

१ एम. एल. डी. पानी चोरी हो गया मतलब १० लाख लिटर पानी चोरी हुआ। लिकेज वगैरे सब मिलाकर पानी कम हो जाता है। इतना पानी लिकेज हाता है उसका जिम्मेदार कौन है। आपको उसका जवाब नही देना है क्या? आपली एकूण ८ लाख जनसंख्या आहे. एक आदमी के लिये १०० लिटर पानी सँक्शन है। तो ८ लाख के उपर कितना पानी हुआ? अभी आपका पानी कटौती का विषय चल रहा है। इसलिये मै बोल रहा हूँ। हम लोगोको ६०० एम.एल.डी. पानी सँक्शन है। हमारे यहाँपर जनसंख्या बढ रही

है। यह जनसंख्या लिगल होगी या इललिगल होगी तो भी जनसंख्या बढ रही है। सब लोग पानी का इस्तेमाल कर रहे है। अगर ऐसी पानी की पोझीशन रहेगी तो पानी कैसे पुरेगा? उसका कुछ रस्ता दिखाईये।

**रोहिदास पाटील :-**

मी माझ्या वॉर्ड मध्ये पाणी नाही. तरी सुध्दा बोलत नाही असे तुम्हाला वाटते का?

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, मै इस्ट, वेस्ट सब मिरा भाईंदरके बारे मे बोल रहा हू। मेरे दोस्त वेस्ट मे रहते है। वह मुझे पानी की क्या पोझीशन है ऐसे पुछते है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

गेल्या दोन ते अडीच महिन्यापासून पाणी येत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या दोन महिन्यामध्ये पाण्याची जी बिकट परिस्थिती निर्माण झालेली होती त्यावेळेला २७ - ३० तासाचे दोन शट डाउन झालेले होते. पाणी येण सुद्धा कमी झालेले होते. ही अडचण चेन्यापासून उत्तन पर्यंत संपूर्ण शहरामध्ये निर्माण झालेली होती. आता जवळपास परिस्थिती सुधारलेली आहे. आता तक्रारी कमी झालेल्या आहेत. जर कुठे इन्डीव्हिज्युअल तक्रारी असतील तर आम्ही स्वतः तिथे व्हिजीट करतो आणि जाउन बघतो तिथे काही सुधारणा करण्यासारखी असेल तर करतो. आपण आता आपल्या प्रभागात जॉईन्ट व्हिजीट केलेली आहे. तुम्हाला निश्चितपणे आठ दिवसाच्या आतमध्ये पाणी पुरवठ्यामध्ये फरक झालेला आढळून येईल.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, फरक पडलेला नाही. म्हणून मी तूम्हाला सांगतो. आम्हाला आश्वासन मिळालेले आहे. आम्ही पाईपलाईन साफ करून देतो. हे करून देतो ते करून देतो. असे सांगितलेले होते. परंतु, तसे झालेले नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मी ह्या स्थायी समितीमध्ये बोललो त्याचे तसे सजेशन आहे.

**मा. सभापती :-**

आठ दिन के अंदर देंगे ऐसे बोला था। नही देंगे तो कार्यवाही होगी।

**हंसुकुमार पांडे :-**

आठ दिन के अंदर कुछ फरक नही पडेगा। फिर आप कार्यवाही किजिये।

**रोहिदास पाटील :-**

आता स्थायी समिती लागणार आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आप कल व्हिजीट किंजिये। कल परसो आपको जब टाईम मिलेगा तब आपण फोन करके बताईये हम लोग व्हिजीट करने के लिये आयेंगे।

**तुळशीदास म्हात्रे :-**

श्री. बारकुंड साहेब अभिनव विद्यामंदिरच्या गेटजवळ पाणी खुप दिवसापासून लिकेज झालेले आहे. तिथे रस्ता बंद आहे. गाड्या, टँकर कसे जाणार? मी श्री. बारकुंड साहेबांना फोन करुन सांगितले होते. त्याच्यात काही सुधारणा झालेली नाही. आपण जसा मेळावा बघतो. तसा मेळावा पाण्याच्या टाकीवर असतो. त्या मेळाव्यासाठी नविन येणारे नागरिक जात असतात. म्हणजे पाणी मागण्यासाठीच जातात. पाणी मागण्यासाठी अनेक नविन-नविन लोक जातात. ते लोक पाण्यासाठी त्या ठिकाणी गेल्यानंतर त्या ठिकाणचा रस्ता इतका खराब आहे. तुम्ही जर टाकीवर जात असला तर तुम्हाला माहिती असेल. त्याठिकाणी एवढा चिखल आहे की, शहरात कुठेच इतका चिखल नसेल. शहरातील नविन नागरिक पाहणी केल्यानंतर जर त्या ठिकाणी पाणी घेण्यासाठी जात असेल तर तो आपल्याबद्दल काय बोलत असेल.

**रोहिदास पाटील :-**

ते याबद्दल काही बोलतच नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

सार्वजनिक बांधकाम विभागानेसुध्दा सांगावे.

**शिवाजी बारकुंड :-**

आता परिस्थिती अशी आहे की, आपली २४ तास यंत्रणा तिथे चालू आहे. जरी रस्त्याचे काम करायचे म्हटले तरी टँकर वगैरे बंद ठेवायला लागतील. जिथे मोठे खड्डे नाहीत आपण त्याठिकाणी तात्पुरती व्यवस्था केलेली आहे. आता आम्ही तिथेच असतो. परंतु, पक्के काम करायचे असेल तर संपूर्ण रस्ता ८ ते १० दिवस पूर्णपणे बंद करायला लागेल. टँकरसुध्दा बंद करावे लागतील.

**रोहिदास पाटील :-**

श्री. म्हात्रे साहेबांनी तुम्हाला दोन पध्दतीची विनंती केलेली आहे. एक म्हणजे साईबाबा मंदिरासमोर असलेले डबके की पीण्याच्या टाकीच्या बाहेरचा तो रस्ता आपलाच आहे. तिथे बाहेर वॉल आहे. ते एक मोठे डबके तो एक रस्ता आहे आणि आतमध्ये जायला रस्ता आहे. तो एक रस्ता तुम्ही लगेच आतमध्ये जो रस्ता जातो. त्यालाच जोडले. पुढे जे टँकर, रिक्षा उभे राहतात. तो तर भाग साफ करा.

**एस. ए. खान :-**

परंतु, मेन रस्त्यावर आपण पाईप आणू शकतो. एक दहा-पंधरा दिवसासाठी बाहेर पाईप जोडून घेउ शकतो.

**रोहिदास पाटील :-**

तशी सिस्टिम तयार करा. सिमेंट काँक्रीटचा रस्ता तयार करा.

**एस. ए. खान :-**

सिमेंट काँक्रीटचा रस्ता करा आणि इस्टीमेट तयार करा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जेव्हा काँक्रीट कराल त्यावेळेला जर पंधरा ते वीस इंचाचे असेल तर तुम्ही तीन इंचाचे पाईप टाकून घ्या. त्यासाठी दोन पाईप आणा. ते पाईप सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये मिळतील.

**जयंत पाटील :-**

श्री. शिवाजी बारकुंड साहेब, हा ठराव मांडताना आपण एका गोष्टीकडे लक्ष द्या. आपण टँकरवाल्यांना रु. २७०/- देतो आणि लोकांकडून आपण ३२५/- घेतो. आणि महापालिकेला फक्त रु. ५५/- मिळतात. एरवी आम्ही जे पाणी घेतो. आम्ही त्या १०.००० लिटर पाण्याचे रु. ७०/- देतो आणि इकडे लोकांकडून रु. ५५/- घेतो. म्हणजे ५५/- इकडे आणि तिकडे लोकांकडून आम्ही कमी घेतो. ह्याच्यामध्ये महापालिकेचे नुकसान होईल.

**शिवाजी बारकुंड :-**

मागील तीन वर्षाचा बजेटमधील रेकॉर्ड  बघा. ह्याच्यातुन महापालिकेला उत्पन्नच मिळालेले आहे.

**जयंत पाटील :-**

महापालिकेला उत्पन्न जरी मिळालेले असले तरी तुम्ही आमचा पाण्याचा दर कमी करता का?

**शिवाजी बारकुंड :-**

कुठल्या पाण्याचा दर?

**जयंत पाटील :-**

तुम्ही सर्वसामान्य लोकांकडून ७/- रुपये प्रमाणे घेता.

**शिवाजी बारकुंड :-**

हा दर आता आलेला आहे. आतापर्यंत आपल्याकडे आपण पाण्याचे रु. ८५/- घेत होतो आणि रु. २४५/- वाहतुकीचे देन होतो. ही निविदा ह्या वर्षासाठी आलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तसे होऊ शकते का?

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या वर्षीची निविदा आलेली होती.

**जयंत पाटील :-**

मग तुम्ही निविदा रिकॉल करा. तुम्ही रु. ५५/- मध्ये रु. १५/- नगरपालिकेचे लॉस कशाला करता?

**शिवाजी बारकुंड :-**

मग रु. १५/- एका फेरी मागे वाढवावे लागतील.

**रोहिदास पाटील :-**

मग फेरी मागचे पैसे कमी करायला सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही कमी करायला सांगतो. वाढवायला सांगत नाही. निगोसिएशन केले तर एकंदरीत डिझेलची दरवाढ होते बाकी दुसरी कुठली दरवाढ होत नाही. याबाबत सर्व सन्मा. सदस्यांना कल्पना आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी तुमच्याशी निगोसिएशन केले तर तुम्ही त्यांना निगोसिएशन कमी करायला सांगा. ही सभा अशी विनंती करित आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही महापालिकेची बाजू घेता की टँकरवाल्यांची? महापालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे की, नाही ह्याचे प्रथम स्पष्टीकरण करा. महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होणे हे गरजेचे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

गेल्या तीन वर्षात ह्याच्यामध्ये सतत महापालिकेचा आर्थिक फायदा झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

मुळात या शहरांतील टँकर बंद झाले पाहिजेत असे आमचे म्हणणे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही ह्या शहरातील लोकांना रु. ७०/- चे पाणी रु. ३२५/- ला का देता? त्यांना पाण्याची आवश्यकता आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही पाच टँकर प्वॉईन्ट बंद केलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

श्री. हंसुकुमार पांडे साहेबांनी सांगितले की या शहरामध्ये ८६ एम.एल.डी. पाणी येते. ह्याच्यामध्ये २० टक्के नुकसान झालेले आहे. प्रति दिवशी तुम्हाला किती एम.एल.डी. पाणी येते?

**शिवाजी बारकुंड :-**

पर डे ६६ एम.एल.डी. पाणी येते.

**जयंत पाटील :-**

हे ६६ एम.एल.डी. पाणी येते. तुम्ही फ्लोटिंग ७ लाख लोकवस्ती सोडून द्या. मग तुम्ही ७ लाख लोकवस्तीला पर हेड १०० लीटर पाणी द्यायला पाहिजे. तुमची कुठेतरी डिस्ट्रीब्युशन सिस्टिम बरोबर नाही. एका ठिकाणी चांगले पाणी येते, तर दुसऱ्या ठिकाणी पाणी मिळत नाही.

**रतन पाटील :-**

आमच्या प्रभागात पाणी कमी येते. आमच्या प्रभागात किती पाणी येते? याचा तुम्हाला आलेख देऊ का?

**जयंत पाटील :-**

या शहरातील अर्ध्या लोकांना पाणी मिळत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

ज्या ज्या ठिकाणच्या तक्रारी येतात मी त्या ठिकाणी जाऊन स्वतः जातीने उपस्थित राहून त्या तक्रारी दूर करतो. आपल्या तक्रारी दूर केलेल्या आहेत की नाही?

**जयंत पाटील :-**

जेव्हा आम्ही तक्रार देतो त्यावेळेला त्या तक्रारी सॉल्व्ह होतात.

**रतन पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब हा नियम कुठला आहे? तुम्ही एखाद्याला २४ तास पाणी देता आणि एखाद्याला ३० ते ३६ तास पाणी देता हा नियम कुठला आहे? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

आता या ठिकाणी महत्वाचा विषय कुठला आहे? तो प्रथम द्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही पाण्याचा विषय सगळ्यांना सारखा करता का?

**शिवाजी बारकुंड :-**

कसला नियम?

**रतन पाटील :-**

एखाद्याला तुम्ही २४ तास पाणी देता आणि एकाला ३० ते ३६ तास पाणी देता. ते तुमचे लाडके आहेत का?

**शिवाजी बारकुंड :-**

कोणीही लाडके वगैरे नाही.

**रतन पाटील :-**

मग आम्ही कुठली पापं केलेली आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, या शहरामध्ये कुठल्या शहराला, कुठल्या भागाला किती पाणी जाते याचे लवकरच या स्थायी समिती आणि मा. महासभेला प्रेझेंटेशन होणार आहे. याच्यामध्ये कोण किती पाणी घेऊन किंवा श्री. बारकुंड सगळं पाणी घेऊन त्यांच्या खिशात ठेवतो त्याच्यातला भाग नाही.

**रतन पाटील :-**

आम्ही आरोप करत नाही. तुम्ही पाणी विभागाचे अधिकारी आहात. आपल्या बंगल्यावर २४ तास पाणी मिळते की नाही? ते सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही माझ्याबद्दल इन्डिव्हिज्युअल बोलू नका. माझ्यावर माझ्याबद्दल इन्डिव्हिज्युली बोलू नका. तुम्ही कार्यकारी अभियंता म्हणून बोला.

**रतन पाटील :-**

तुम्ही पाणी खात्याचे अधिकारी आहात म्हणून मी तुम्हाला बोलतो. तुम्ही पाणी का येत नाही ते सांगा?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही त्यांच्याबद्दल इन्डिव्हिज्युअली बोलू नका. सार्वजनिक गोष्ट बोलण्यासरखी असेल तर बोला.

**रतन पाटील :-**

ते पाणी विभागाचे अधिकारी आहेत. मी त्यांना तुमच्या विभागात २४ तास पाणी मिळते असे सांगतो. मग मी काही चुकीचे बोलतो का?

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही एक मिनिट खाली बसा. मी तुम्हाला तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी चांगल्याप्रकारे आणि बेनिफिटेड चर्चा व्हायला पाहिजे. त्याच्यातुन काही मार्ग निघायला पाहिजे, त्याच्यामधुन काही सुझाव मिळाले पाहिजेत. आम्ही तुमच्या सर्व सुचनांचे पालन करुन काम करतो.

**रतन पाटील :-**

साहेब, आम्ही तुम्हाला सहकार्य करतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हाला आम्हाला सहकार्यच करावे लागणार आहे. आपण एकजुटीने काम करायला पाहिजे. आपण जर वैयक्तिक आरोप केला तर वाद निर्माण होतो.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, आम्ही वैयक्तिक आरोप करत नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही शक्यतो आरोप करु नका. तुम्ही फक्त खुलासा करा.

**जयंत पाटील :-**

माझे म्हणणे असे आहे की, तुम्ही याठिकाणी रु. ५५/- घेता आणि रु. १५/- महापालिकेचे नुकसान करता. त्याच्या ठेकेदाराचे रु. २५०/- करुन टाका. तुम्ही सदर ठेकेदाराला या ठिकाणी बोलवा. नाहीतर माझ्याकडचा ठेकेदार रु. २५०/- द्यायला तयार आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

ठिक आहे.

**जयंत पाटील :-**

प्रथम त्या ठेकेदाराला संधी द्या. जर त्याच्याकडून काम नाही झाले तर नंतर बघूया.

**रोहिदास पाटील :-**

मी या ठिकाणी एक चिंतेची बाब सांगतो की, हे स्वाभाविक आहे किंवा हे खरे आहे किंवा ह्याच्यामध्ये लपविण्याचे काहीही कारण नाही. आपल्या शहरात पाणी टंचाई सुरु होत चाललेली आहे. त्याचे प्रिकॉशन घेण्याच्या दृष्टीने काही ठिकाणी पंपाने पाणी खेचले जाते. ज्यांना पाणी मिळणार नाही तो पंपाने पाणी खेचल असे तुम्ही निवेदन करा. अधिकारी म्हणतील, हे ही म्हणतील आणि मी ही तेच सांगेन. परंतु, त्याचे जे काही दुष्परिणाम आहेत जेव्हा एका पाईप लाईनमधून मोठ्या क्षमतेच्या पंपाने पाणी खेचले की ती पाईप लाईन रिकामी होते. बाहेरचे पाणी आतमध्ये येते. घाण पाणी आतमध्ये आल्यानंतर जेव्हा आपण पुन्हा दुसऱ्या दिवशी पाणी सोडतो मग ते पाणी २४ तासाने असु दे किंवा ४८ तासाने असु दे. जेव्हा पाणी सोडतो तेव्हा पंप लावणारा हा माणूस असतो जो इकडचे पाणी खेचतो जेव्हा परत पाणी सुटते तेव्हा इकडून पाणी तिकडे जाते. जे घाण पाणी असते ते त्या लाईनच्या मिळते. म्हणजे पंपाने पाणी खेचणाऱ्याला ते घाण पाणी मिळत नाही. घाण पाणी बाहेरच्या लोकांना मिळते. आता अनेक पाईप लाईनवर दोन मिनिटाचे, पाच मिनिटाचे घाण पाणी यायला सुरुवात झालेली आहे. अनेक पाईप लाईन आहेत. माझी तुम्हाला विनंती आहे, या सभागृहाची तुम्हाला विनंती आहे की, ज्या ठिकाणी असे पंप असतील त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करा ते पंप काढा. अन्यथा श्री. खतगावकर साहेब तुमचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. परंतु, आम्ही ते भागेलेले आहे. पहिल्यांदा ते पाणी बंदरवाडीला येत होते. परंतु, आता ते पाणी खारीच्या नाक्यावर गेले. खारीच्या नाक्यावरुन गोडदेव नाक्यावर गेले. गोडदेव नाक्यावरुन गोडदेव टाकीवर गेले. ते खेचत खेचत संपूर्ण पाईप लाईन त्यामुळे तोडली गेलेली होती. लोक भोक पाडतच चालले होते. नवघरचे पाणी गोडदेव टाकीवर आलेले होते. हे सर्वांना माहिती आहे. अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. परंतु, पाणी तर येते. पुन्हा त्याला भोक पाडायची किंवा पंप लावायची कोणालाही हिम्मत होऊ नये. ही व्यक्तिगत कोणाची किंवा कोणत्या एका व्यक्तीची किंवा श्री. रोहिदास पाटील साहेबाचा पंप आहे अशी मी तक्रार करत नाही. परंतु, पंपाची सिस्टिम जर वाढली तर जो तो पंप घेत जाईल आणि नंतर पुढे पुढे भोक पाडायला सुरुवात होईल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही माझ्या गावात जाऊन बघाल तर तुम्हाला असे आढळून येईल की, प्रत्येक घरांमध्ये पंप लावलेले आहेत. मी परवा दिवशी दुपारी जेवायला गेलो त्यादिवशी सगळ्यांकडे पंप लावलेले होते. आपण आपले बघितले पाहिजे.

**रतन पाटील :-**

ती कार्यवाही झाली पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

याबाबत कोणीही बोलत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

गेल्या दोन दिवसांपासून मिरा रोडला कार्यवाही सुरु आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही कडक कार्यवाही करावी.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नवघरच्या काही लोकांना पाणी मिळत नाही आणि जी लोक पाणी पंपाने असेच २४ तास वाहून फुकट घालवतात. त्यांच्यावर कायदेशीर केससुध्दा करा.

**शिवाजी बारकुंड :-**

श्री. तुळशीदास म्हात्रे साहेब आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना सांगु इच्छितो की मागच्या वेळेला पंपावरुन चर्चा झालेली होती आणि मध्यंतरी गणपती पासुन सर्व धर्मियांचे धार्मिक सण होते. त्यामुळे त्याच्यावर कार्यवाही केलेली नव्हती. आता दिवाळी आणि ईद झाल्यानंतर कार्यवाही ऑलरेडी सुरु झालेली आहे. प्रत्येकाला नोटीस दिलेली आहे आणि वेळ दिलेली आहे त्याप्रमाणे आपली जप्तीची कार्यवाही चालू झालेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती कार्यवाही झोन वाईस प्रत्येक एरियामध्ये होईल असे करा.

**शिवाजी बारकुंड :-**

संपूर्ण शहरामध्ये ज्या वेळेस पाणी सुटेल त्या त्यावेळेसच मोटारी लावलेल्या असतात. त्यामुळे त्याला ॲक्शन घेण्यासाठी वेळ लागतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ह्याच्यावर एक पथक नेमा आणि अधिकाऱ्यांकडून काम करुन घ्या.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण आहे त्या लोकांकडून काम करतो. आपल्याकडे स्टाफ कमी आहे. आपल्याला वेगळे पथक नेमण्याची गरज नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब सदर विषय मंजुर आहे ना.

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १३२ :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १३६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे.**

दि. ०५/१०/२००६ रोजीच्या दै. सकाळ व दै. सुरजप्रकाश या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या उपरोक्त कामाच्या जाहिर निविदे सुचनेनुसार निविदा सुचना क्र. ०९ (२००६-०७) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | **ठेकेदाराचे नांव** | **देकार (प्रति फेरा)** |
|---|---|---|
| १) | मे. सागर वॉटरसप्लाय | रु. २७०/- |
| २) | मे. डीसिल्वा ट्रान्सपोर्ट ॲन्ड वॉटर सप्लायर्स | रु. २७०/- |
| ३) | मे. बी.बी. वॉटर ट्रान्सपोटर्स वेलफेअर असो. | रु. २८०/- |
| ४) | मे. मारीया वॉटर सप्लायर्स | रु. २८५/- |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. सागर वॉटर सप्लाय व मे. डिसिल्वा ट्रान्सपोर्ट ॲन्ड वॉटर सप्लायर्स यांनी सादर केलेल्या रु. २७०/- प्रति फेरा दराच्या निविदा लघुत्तम आहेत. वरील दोन्ही निविदांचे दर समान आहेत. सबब सदरचे दर वाजवी व रास्त वाटत असल्याने मे. सागर वॉटर सप्लाय व मे. डीसिल्वा ट्रान्सपोर्ट ॲन्ड वॉटर सप्लायर्स यांची निविदा मंजुर करणेस व याकामी वेळेवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. परशुराम म्हात्रे.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३३ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १३३ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १३७ :-**

मिरा भाईंदर महागनरपालिका क्षेत्राची सद्यस्थितीतील लोकसंख्या सुमारे ६ ते ७ लाख इतकी आहे. तसेच शहराची सिमा ही मुंबई महापालिकेच्या सिमेला लागुन असल्याने शहरात नागरिकरण झपाट्याने होत आहे. सद्यस्थितीत महापालिकेकडे एकच शववाहिनी व फिरता दवाखाना असल्याने महापालिकेकरिता एक नविन सुसज्ज फिरता दवाखाना व शववाहिनी खरेदी करण्याची आवश्यकता आहे. सदर वाहनांकरिता चेसीज खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली असून सदर मंजुरीच्या अनुषंगाने मे. बाफना मोटार्स यांचेकडून खालील प्रमाणे चेसीज खरेदी केलेल्या आहेत.

| वाहन प्रकार | चेसी | किंमत |
|---|---|---|
| शववाहिनी | टाटा मॉडेल ४०७ एसएफसी | रु. ४,८५,५१६/- |
| फिरता दवाखाना | टाटा मॉडेल ४०७ एसएफसी | रु. ४,९५,७७७/- |

शववाहिनी व फिरता दवाखाना या वाहनांसाठी चेसीज खरेदी व त्याकामी येणारं देयक अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) अन्वये अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३४ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १३४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (वृक्षप्राधिकरण विभाग)

**ठराव क्र. १३९ :-**

१) उद्याने, स्मशानभुमी, क्रिडांगणे यामध्ये मोठ्या वृक्षांच्या खाली केलेले बसण्याचे कट्टे सुशोभिकरण (लॅण्ड स्केपींग) यांची स्वच्छता राखण्यासाठी ग्रीन हाउस आच्छादणे (शेड) तयार करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाच्या उद्यान, क्रिडांगणे यामध्ये मोठ्या वृक्षांच्या खाली केलेले बसण्याचे कट्टे व सुशोभिकरण (लॅण्ड स्केपींग) यांची स्वच्छता राखण्यासाठी ग्रीन हाउस आच्छादणे (शेड) तयार करणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार सामना या वृत्तपत्रांत जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असुन दि. २५/९/२००६ ने कार्यादेश देण्यात आले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. एस. बी. इंटरप्रायजेस | मे. प्रेयस कॉर्पोरेशन | मे. नम्रता इंटरप्रायजेस | मे. पारूल इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|
| १. | नायलॉन सुताचे कापड लोखंडी अँगलसह फिटींग करणे | १३५/- प्र. फुट | १२१/- प्र. फुट | १४५/- प्र. फुट | १२९/- प्र. फुट |
| २. | रंगबेरंगी प्लॅस्टिक पत्रे लोखंडी अँगलसह फिटींग करणे | १४५/- प्र. फुट | १३१/- प्र. फुट | १६५/- प्र. फुट | १३६/- प्र. फुट |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता '' मे. प्रेयस कॉर्पोरेशन'' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस व त्यांस मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेंस शिफारस असे.

२) उद्यान व वृक्षप्राधिकरण विभगाकरीता लालमाती व शेणखत खरेदी करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभगाकरीता लालमाती व शेणखत मागील काम करणारे ठेकेदार मे. भुषण ट्रान्सपोर्ट हे मागील दराप्रमाणे लालमाती शेणखत पुरवठा करण्यास तयार

असून शासन निर्णय क्रमांक एस. पी. ओ. १०८८/२५१२/उद्योग-६ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार पुर्ण प्रत्यापी आदेश देण्याचे निर्देश दिलेले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ संविदा कलम ७३ महानगरपालिकेच्या वतीने संविदा करून देण्याचा आयुक्तांचा अधिकार ७३ (ड)'' नुसार मा. आयुक्त सो. यांनी दि. ११/०८/२००६ रोजी मंजुरी दिलेली असुन दि. २४/८/२००६ ने कार्यादेश देण्यात आले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | मंजुर दर |
|---|---|---|---|
| १. | लालमाती | ७५० ब्रास | रू. ८०५/- प्र. ब्रास |
| २. | शेणखत | १०० ब्रास | रू. ७४५/- प्र. ब्रास |

३) महानगरपालिकेच्या दुतर्फा रोडच्या कडेला वृक्षारोपण कार्यक्रमासाठी रोपे पुरवठा करणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामे दि. ४/७/२००६ रोजी दै. वृत्तमानस व दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | तपशिल | मे. दिक्षा इंटरप्रायजेस | मे. स्नेहल इंटरप्रायजेस | मे. ए.एम नर्सरी | मे. कुश इंटरप्रायजेस | मे. प्रथम इंटरप्रायजेस | मे. सागर इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कडूलिंब | ५८/- प्र. रोपे | ५१/- प्र. रोपे | ५४/-प्र. रोपे | ५४/-प्र. रोपे | ५६/-प्र. रोपे | ४८/-प्र. रोपे |
| २. | अशोक | ६७/- प्र. रोपे | ६४/-प्र. रोपे | ७१/-प्र. रोपे | ६६/-प्र. रोपे | ६९/-प्रे. रोपे | ५९/-प्र. रोपे |
| ३. | सप्तपर्णी | १०३/- प्र. रोपे | १०२/-प्र. रोपे | १०९/-प्र. रोपे | १०५/-प्र. रोपे | १०८/-प्र. रोपे | ९८/-प्र. रोपे |
| ४. | बदाम | ६७/- प्र. रोपे | ६२/- प्र. रोपे | ७०/-प्र. रोपे | ६५/-प्र. रोपे | ६८/-प्र. रोपे | ५७/-प्र. रोपे |
| ५. | गुलमोहर | ६०/- प्र. रोपे | ५३/-प्र. रोपे | ५४/-प्र. रोपे | ५५/-प्र. रोपे | ५८/-प्र. रोपे | ४९/-प्र. रोपे |
| ६. | रेन्ट्री | ५७/- प्र. रोपे | ५२/-प्र. रोपे | ६०/-प्र. रोपे | ५१/-प्र. रोपे | ५५/-प्र. रोपे | ४८/-प्र. रोपे |
| ७. | निलगिरी | ५७/- प्र. रोपे | ५०/-प्र. रोपे | ५४/-प्र. रोपे | ५२/-प्र. रोपे | ५५/-प्र. रोपे | ४७/-प्र. रोपे |
| ८. | सरू | ३६/- प्र. रोपे | ३५/-प्र. रोपे | ४२/-प्र. रोपे | ३८/-प्र. रोपे | ४०/-प्र. रोपे | ३२/-प्र. रोपे |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता '' मे. सागर इंटरप्रायजेस'' यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी वरील प्रस्तावाचे अवलोकन करून ही स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३५ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १३५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या प्रस्तावांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | मजुर संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ४० मी.मी. व १०० मी.मी. व्यासाचे एअर वॉल पुरवठा करणे | रु. ४,९२,९०२/- | संतकृपा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. वाडा जि. ठाणे |
| २ | ५० मी.मी. व ८० मी.मी. व्यासाचे एअर वॉल पुरवठा करणे | रु. ४,८६,६१६/- | संतकृपा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. वाडा जि. ठाणे |
| ३ | चवळी येथे बुस्टर पंप पुरवठा करणे व त्याकरीता पंपरुम बांधणे. | रु. २,४३,७०८/- | श्री. सदगुरु कृपा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण जि. ठाणे |
| ४ | साईनाथ नगर (घोडबंदर) येथे जी.आय. जलवाहिनी अंथरणे | रु. १,७८,३६७/- | श्री. सदगुरु कृपा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण जि. ठाणे |

वरील कामी मा. जिल्हा निबंधक ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजुर सह. संस्थांना स्विाकारणेस व त्याकामी येणारे देयक अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ खंड ड नुसर वरील प्रकरणी मा. स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर करणेत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपण आता इलेक्शन ड्युटीवर बरेच अधिकारी आणि क्लार्क वगैरे नेमलेले आहेत. आमच्या उत्तन विभागामध्ये जे विभागीय कार्यालयामध्ये जे प्रमुख आहेत. त्यांची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे त्यांच्या कामाचा खोळंबा पडलेला आहे. तिकडे कोणीही जबाबदार व्यक्ती नाही. तिथे पाण्याची बिले असतात, टॅक्स असतात, ट्रान्सफरची प्रकरणे असतात. कर आकारणी असतात तुम्ही तिथे एक जबाबदार व्यक्ती म्हणून किंवा तिथे जे अधिकारी आहेत. त्यांना तिथे ठेवा. म्हणजे ॲडीशनल क्लार्कची गरज लागणार नाही. त्यामुळे लवकरात लवकर क्लार्कची सोय करुन घ्या.

**मा. सभापती सो. :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**